RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

**निवडणुकीचे साईड इफेक्ट; कामासाठी मिळेनात मजूर**

पान 3 पाहा

# मराठी अक्रॉस मुंबई

**तुम्ही अडीच वर्षांत काय केले? समोरासमोर येऊन चर्चा करा एकनाथ शिंदेंचे आव्हान**

पान 8 पाहा

संपादक- संजय मंगेश भैरे
वर्षः ९ अंक : ५० ■ मुंबई, मंगळवार १२ ते १८ नोव्हेंबर '२४
मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

## संपूर्ण देशाने काँग्रेसला नाकारले

### पंतप्रधान मोदींनी नाशिकमधून डागली तोफ

■ नाशिक

काँग्रेस आणि घटकपक्ष असेल तर घोटाळेच होणार आहे. राज्यात तुम्ही यांना पापं करु देणार का? संपूर्ण देशानं काँग्रेसला नाकारलं आहे, ती ऑल इंडिया नाही, ती परजीवी आहे. पायघड्यांवरच ती जिवंत आहे. बिहार, झारखंड अशा राज्यात दुसऱ्यासोबतच निवडणुका लढत आहे, असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर केला. नाशिक येथे आयोजित महायुती उमेदवारांच्या प्रचार सभेतून ते बोलत होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, रामाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नाशिकला माझा नमस्कार. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पहिल्या दिवशी मला नाशकात येण्याचे सौभाग्य मिळाले. अयोध्येत प्राणप्रतिष्ठा आधी 11 दिवसांच्या अनुष्ठानाची माझी सुरुवात नाशिकमधून झाली होती. काळाराम मंदिरात मला सेवेचा लाभ मिळाला. विकसित महाराष्ट्र, भारतासाठी नाशिकचा आशीर्वाद घेण्यासाठी आलोय. मी पाहतोय नाशकात जनसमूह, महाराष्ट्र बोलतोय भाजप महायुती आहे तर गती आहे, राज्याची प्रगती आहे.

सोयाबीन कापूस आणि दूध उत्पादकांना देखील मदत केली गेली आहे. देशाचा रुपया विदेशात गेला तो आता शेतकऱ्यांना मिळतोय त्यांना जातोय. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या भावना समजतो, धोरण आपण बदलली आहेत. महाराष्ट्र वेगाने पुढे जाणे गरजेचे आहे. महाराष्ट्र पुढे जाईल तेव्हा देश पुढे जाईल. मागील अडीच वर्षात ते महायुतीने दाखवले आहे. अनेक प्रकल्प बनवण्यात महाराष्ट्र पुढे आहे. तंत्रज्ञानात निधी येतोय. मात्र सरकार आले नाही तर प्रगती होईल का? महाराष्ट्रातील युवकांना रोजगाराचे अवसर मिळणार का? आपण खूप मागे जाऊ. मेट्रो थांबवली, समृद्धी महामार्ग थांबवण्याची कामं केली, अटल सेतूमध्ये अडथळा आणला. प्रकल्प थांबवण्यात मविआ आघाडीवर आहे. आघाडी वाल्यांना सरकारपासून दूर ठेवा. महायुती सरकारनं विकासाच्या अजेंड्यावर नाशिकला देखील मोठं महत्त्व मिळालं आहे. हायवे बनत आहे, वाहतूक व्यवस्था होत आहे. 2026 च्या कुंभमेळ्यात देखील याचा फायदा होईल. नाशिकमधील आयटी पार्क रोजगार तयार करेल. नाशिक डिफेन्स क्षेत्रात मोठं केंद्र देखील बनतोय. नाशकात सुरक्षेची उपकरणं बनवली जात आहेत. नाशिक सशक्त भारतात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. काँग्रेस आणि आघाडीवाले लोकं आहेत, ते देशाला कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहेत. डिफेन्समध्ये कमकुवत करण्यासाठी एचएएलसंदर्भात खोटा प्रचार केला. धरणे आंदोलन केले, कर्मचाऱ्यांना भडकवले. मात्र एचएएल रेकॉर्ड ब्रेक कामं करत आहे. नाशिक त्याचे परिणाम बघत आहे.

काँग्रेस आणि त्यांच्या साथीदारांना कोणाचीच पर्वा नाही. रिकाम्या पानांची संविधानाची प्रत घेऊन फिरतात. संविधानाची गोष्ट येते तेव्हा उलट्याच गोष्टी करतात. 75 वर्षात आंबेडकर यांचे संविधान जम्मू काश्मीरात लागू होऊ दिले नाही. काँग्रेस हे पाप होते. कलम 370 ची भिंत उभी केली होती. भाजपा एनडीएनं हे हटवलं आणि एक देश एक संविधान लागू केलं. माझी हीच आंबेडकरांना खरी श्रद्धांजली आहे. भारताचे संविधान जम्मू काश्मिरीत लागू झाले तेव्हा सर्व देश आनंदी झाला होता. तुम्हाला आनंद झाला. मात्र काँग्रेस आणि त्यांच्या सोबतच्यांच्या पोटात दुखायला लागले. दोन-तीन दिवस आधी काँग्रेस आणि साथीदारांनी 370 लागू करण्यासाठी गोंधळ घातला. जम्मू काश्मीरमध्ये आंबेडकरांचे संविधान हटवले जावे हे यांना पाहिजे. दलित, वाल्मिकी समाजाचे आरक्षण काढावं असं त्यांना वाटतंय. आघाडीतील इतर घटक पक्ष देखील याला जबाबदार आहेत. जनतेसमोर आपली कामं दाखवत निवडणुकीत जात असतो मात्र काँग्रेसकडे आता एकच पर्याय आहे. काँग्रेसची खोटं बोलण्याची दुकान आहे. काँग्रेस आणि चेल्यांनी हे दुकान महाराष्ट्रात लावलंय. कर्नाटक, हिमाचलमध्ये हेच केलं आणि तिथे काय झालं? निवडणुका संपल्या आणि दुकान बंद झालं तेव्हा केलेल्या गोष्टी पूर्ण नाही झाल्या. सरकार चालवण्यासाठी यांच्याकडे पैसे नाहीत. जनतेवर कर लादला जातोय. जनता यांची खरी खोटी जाणते. महायुतीचं घोषणापत्र एका बाजूला आणि दुसरीकडे मविआचे घोटाळा पत्र आहे. काँग्रेस आणि घटकपक्ष असेल तर घोटाळेच होणार आहे. राज्यात तुम्ही यांना पापं करु देणार का? संपूर्ण देशानं काँग्रेसला नाकारलं आहे, ती ऑल इंडिया नाही आहे ती परजीवी आहे. पायघड्यांवरच ती जीवंत आहे. बिहार, झारखंड अशा राज्यात दुसऱ्यासोबतच निवडणुका लढत आहे. स्वत:ला वाचवण्यासाठी काँग्रेसने आपला हत्यार चालवलं आहे. एससी, एसटी ओबीसींची एकता तोडा आणि राज्य मिळवा, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.

## भाजपाचे संकल्पपत्र प्रकाशित

■ मुंबई

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाचे संकल्पपत्र प्रकाशित करण्यात आले. यावेळी गृहमंत्री अमित शाह यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, " हे संकल्पपत्र म्हणजे विकसित भारताकरता रोड मॅप आहे. २०१४ च्या निवडणुकीनंतर आम्ही २०१९ च्या निवडणुकीला समोर जात असताना कुठल्या कुठल्या गोष्टी पूर्ण केल्या ते लोकांना सांगितल्या आहेत."

महाविकास आघाडीचा आज जाहीरनामा प्रसिद्ध होणार आहे. त्यावरून उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी टीका करताना म्हटले, "आज १२ वाजता स्थगितीपत्रसुद्धा जारी होणार आहे. ज्यांना केवळ चालणाऱ्या प्रोजेक्टला स्थगिती देण्यात रस आहे, त्यांचे घोषणापत्र आज येणार आहे. महाराष्ट्राच्या जनतेचा विश्वास महायुतीवर आहे." केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, "महाराष्ट्रात अनेक गोष्टींना सुरुवात झाली. गुलामगिरीतून मुक्तीचं आंदोलनसुद्धा शिवाजी महाराजांनी इथूनच सुरू केलं. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा काश्मीरमध्ये निवडणूक झाली. ३७० कलम हटल्यानंतर पहिल्यांदा काश्मीरमध्ये भारताच्या संविधानाची शपथ घेऊन काम करण्याचे कार्य झालं. मजबूत आणि सुरक्षित महाराष्ट्र कसा होईल, याच्यासाठी खास योजना संकल्प पत्रात आहेत."

पुढे अमित शाह म्हणाले,"आमचा मुकाबला महाविकास आघाडीबरोबर आहे. परंतु महाराष्ट्राच्या संस्कृतीबरोबर छळ करून फक्त सत्तेवर राहण्याची त्यांची विचारधारा आहे. मी महाराष्ट्राच्या जनतेला आवाहन करेन, तुम्ही सतत तिसऱ्यांदा आम्हाला जनाधार द्या. २०१४ साली तुम्ही आम्हाला जनाधार दिला. २०१९ मध्ये तुम्ही आम्हाला पुन्हा जनाधार दिला. परंतु काहींनी



यामध्ये खो घातला. जनादेशासोबत द्रोह करून सरकार स्थापन करण्यात आलं. काँग्रेसचा कुणी नेता सन्माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या संबंधित दोन चांगले शब्द बोलू शकतो का? काँग्रेसचा कोणी नेता स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत दोन चांगले शब्द बोलू शकतो का? उद्धव ठाकरे हे राहुल गांधींना याबाबत विनंती करतील का? या देशातून तिहेरी तलाक निघून जाईल, साडेपाचशे वर्षांनंतर या भूमीत राममंदिर उभारलं जाईल, असं कुणाला कधी वाटल होत का?"

"महाराष्ट्रात गुंतवणूक येत नाही, असा विरोधकांकडून प्रचार करत आहेत. आघाडीचं सरकार काही काळासाठी असताना महाराष्ट्रात गुंतवणुकीत मागे होता. एफडीआयमध्ये महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर गेला होता. परंतु आमचं सरकार आल्यानंतर दोन वर्षांत सर्वात जास्त एफडीआय कुठल्या राज्यात आला असेल तर तो महाराष्ट्रमध्ये आला आहे," असा दावा केंद्रीय गृहमंत्र्यांनी केला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, " उद्धव ठाकरे तुम्ही कुठे बसायचं आहे, हे तुम्ही ठरवायचं आहे. पण, तुम्हाला आता आठवण करून देत आहोत, तुम्ही कुठे बसले आहात. ३७० हटविण्याला विरोध करणारे, राममंदिराला विरोध करणारे, छत्रपती संभाजीनगर नावाला विरोध करणारे, सावकरांविरोधात अपशब्द वापरणारे आणि वक्फ बोर्डा विधेयकाच्या दुरुस्तीला विरोध करणारे यांच्याबरोबर तुम्ही बसले आहात.

| |
|---|
| लाडकी बहीण योजनेची रक्कम १५०० रुपयांवरून प्रति महिना २१०० रुपये करणार |
| शेतकऱ्यांचे कृषी कर्ज माफ करून एमएसपी वर २० टक्के सबसिडी देणार |
| ज्येष्ठ नागरिकांचे निवृत्तीवेतन १५०० रुपयांऐवजी २१०० करणार |
| पोलीस विभागात २५ हजार हजार महिला पोलिसांची भरती करणार |
| शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत रक्कम १२ हजार रुपयांवरून १५ हजार रुपये करणार |
| गरजू व्यक्तींना अन्न आणि निवारा देण्याचं आश्वासन |
| ४५ हजार गावांमध्ये रस्ते बांधणीचे आश्वासन सौर उर्जेवर भर देत वीज बिलात ३० टक्के कपात करणार |
| अंगणवाडी आणि आशा सेविकांचं मासिक मानधन १५ हजार रुपये करण्यासोबत त्यांना आरोग्य आणि सुरक्षा कवच देणार |
| १० लाख विद्यार्थ्यांना महिन्याला दहा हजार रुपये शिक्षण शुल्क देणार. २५ लाख नोकऱ्या उपलब्ध करणार |
| जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवण्यात येतील. |

## महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांना जिंकवायचे आहे -अमित शाह

■ शिराळा

विधानसभा निवडणुकीत विजय मिळविण्यासाठी आता सर्वच पक्षांनी जोरदार कंबर कसली आहे. आजपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचारात उतरले आहेत. तर महाविकास आघाडीसाठी राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे हेदेखील प्रचारसभांचा धडाका लावत आहेत. सांगली जिल्ह्यातील शिराळा येथे आज अमित शाह यांची सभा पार पडली. या सभेत अमित शाह यांनी महाविकास आघाडीवर आणि विशेष करून शरद पवारांवर जोरदार टीका केली. तसेच देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत केलेल्या एका विधानामुळे आता राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा सुरू होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



अमित शाह यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला शिराळा येथे समर्थ रामदास स्वामींना अभिवादन केले. तसेच २० नोव्हेंबर रोजी डबल इंजिनचे सरकार आणण्यासाठी महायुतीला मतदान करण्याची भूमिका घ्या, असे सांगितले. मी लोकसभेलाही संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा केला होता. त्यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरलो. जनतेची एकच भावना आहे की, महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांना जिंकवायचे आहे.

अमित शाह पुढे म्हणाले की, औरंगाबाद जिल्ह्याचे नाव छत्रपती संभाजीनगर व्हायला हवे की नको? पण महाविकास आघाडीचे नेते याला विरोध करत आहेत. जे स्वतःला बाळासाहेब ठाकरेंचे वारसदार म्हणवून घेतात, ते उद्धव ठाकरेही या नामकरणाला विरोध करत आहेत. मी शरद पवारांना आज आव्हान देतो, तुम्ही किती जोर लावा पण संभाजीनगरचे नाव छत्रपती संभाजीनगरच राहणार. तसेच जम्मू-काश्मीरमध्ये आम्ही कलम ३७० हटविले. संपूर्ण देशाने याला पाठिंबा दिला. मात्र उद्धव ठाकरे आणि शरद पवार याला विरोध करत आहेत. मी आज शरद पवार यांना आव्हान देतो की, तुमच्या चार पिढ्या आल्या तरी कलम ३७० पुन्हा आणू शकत नाहीत.

## न्यायाधीश संजीव खन्ना यांनी सरन्यायाधीश पदाची घेतली शपथ

■ नवी दिल्ली

न्यायाधीश संजीव खन्ना यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत भारताचे 51 वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. यावेळी कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी सरन्यायाधीश खन्ना यांचे अभिनंदन केले. शपथविधी सोहळ्याला माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड उपस्थित राहीले.

धनंजय चंद्रचूड हे सरन्यायाधीश पदावरून रविवारी निवृत्त झाले. त्यांची जागा न्यायाधीश संजीव खन्ना यांनी घेतली आहे. सरन्यायाधीश खन्ना यांचा सरन्यायाधीश म्हणून सहा महिन्यांचा म्हणजे 13 मे 2025 पर्यंत कार्यकाळ राहणार आहे. केंद्र सरकारनं न्यायाधीश संजीव खन्ना यांची देशाचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यासाठी नुकतीच अधिसूचना जारी केली होती. कायदा आणि न्याय मंत्रालयाने अधिसूचनेत म्हटलं की, भारतीय राज्यघटनेच्या कलम 124 च्या कलम (2) अंतर्गत राष्ट्रपतींनी न्यायाधीश खन्ना यांची देशातील सर्वोच्च न्यायिक पदावर नियुक्ती केली आहे.



सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्याविषयी- 14 मे 1960 रोजी जन्मलेल्या सरन्यायाधीश खन्ना यांनी 1983 मध्ये कायदे क्षेत्रातील कारकीर्दीला सुरुवात केली. खन्ना यांनी प्रथम दिल्ली बार काउन्सीलमध्ये वकिलीला सुरुवात केली. घटनात्मक कायदा, कर, लवाद, व्यावसायिक कायदा आणि पर्यावरण कायदा यासह कायदेशीर क्षेत्रात त्यांना मोठा अनुभव आहे. सरन्यायाधीश खन्ना यांनी प्राप्तिकर विभागाकरिता वकील म्हणूनही काम केले आहे. सरन्यायाधीश खन्ना हे दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश देव राज खन्ना यांचे पुत्र आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश एच.आर. खन्ना यांचा पुतणे आहेत.

मावळते सरन्यायाधीश म्हणून धनंजय चंद्रचूड यांनी शुक्रवारी निरोपाच्या कार्यक्रमात भावूक भाषण केले. यावेळी त्यांनी रांगेत बसलेला कायद्याचा विद्यार्थी होण्यापासून ते सरन्यायाधीश होण्यापर्यंतचा प्रवास उलगडून सांगितला. त्यांनी न्यायाधीश संजीव खन्ना यांचे कौतुक केले. यावेळी धनंजय चंद्रचुड म्हणाले, " न्यायाधीश खन्ना हे खूप स्थिर आणि न्यायासाठी खूप वचनबद्ध आहेत. त्यामुळे आनंदाच्या भावनेनं मी न्यायालयातून बाहेर पडत आहे. सोमवारी येथे येऊन बसणारी व्यक्ती अत्यंत प्रतिष्ठित व्यक्ती आहे. ते व्यापक पातळीवर जागरूक आहेत."

## महिलांना महिना 3 हजार अन् बसचा मोफत प्रवास

### महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचा जाहीरनामा महाराष्ट्रनामा प्रकाशित करण्यात आलाय. महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यात शेतकरी, युवक, महिला आणि आरोग्यावर लक्ष केंद्रित केलंय. तसेच महालक्ष्मी योजनेंतर्गत महिलांना महिना 3 हजार रुपये मिळणार असून, महिलांना बस प्रवास मोफत देण्याचंही आश्वासन देण्यात आलंय. महाविकास आघाडीनं मुंबईत हॉटेल ट्रायडंटमधून हा जाहीरनामा प्रसिद्ध केलाय. यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, खासदार सय्यद नासीर हुसेन, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गहलोत, खासदार अभिषेक मनु सिंघवी, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेनेचे खासदार संजय राऊत, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, शिवसेना उबाठाचे खासदार अरविंद सावंत उपस्थित आहेत.




विकास आघाडीने आपल्या जाहीरनाम्यात 100 दिवसांचा अजेंडा जाहीर केला. पदवीधर आणि पदविका असलेल्या बेरोजगार तरुणांना दरमहा 4 हजार रुपये देण्याचे आश्वासन दिलंय. जाहीरनाम्यात महाराष्ट्रात नवे औद्योगिक धोरण बनवण्याबाबत सांगितलंय. त्यानंतर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीसुद्धा उपस्थितांना संबोधित केलंय. राज्याचे आणि देशाचे मुंबईकडे लक्ष असते. आर्थिक, उद्योग, गुंतवणूक बाबींमध्ये महाराष्ट्र पुढे आहे. राज्याची निवडणूक देशासाठी महत्त्वपूर्ण असून, देशाचे भविष्य बदलणारी निवडणूक आहे, असंही मल्लिकार्जुन खरगेंनी अधोरेखित केलंय. ते पुढे म्हणाले की, राज्यातील विद्यमान महायुती सरकारला हटवून महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर उत्तम प्रशासनाची हमी देतो. शेतकरी, तरुणांसाठी निवडणूक महत्त्वाची असून, मुंबईत आलेली व्यक्ती कधीही उपाशी राहत नाही. मुंबई हे सर्वंकष विकासाचे शहर असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलंय. महाराष्ट्राच्या भविष्याचा विचार अन् अभ्यास करून हा महाराष्ट्रनामा तयार करण्यात आलाय. मोदी नेहमी काँग्रेसवर खोटेपणाचा आरोप करतात, काल आमच्या मुख्यमंत्र्यांनी आम्ही काय केलं ते सांगितलं, महायुतीची अनैतिक आणि असंविधानिक सत्ता असल्याचाही घणाघातही मल्लिकार्जुन खरगेंनी केलाय. भाजपाने पक्षांचे चिन्ह चोरले असून, पन्नास खोके एकदम ओके घरात भरुन ठेवा. महाराष्ट्राचे सरकार खोके सरकार आहे. महाराष्ट्र विकासासाठी आमचा पंचसूत्री कार्यक्रम असल्याचंही मल्लिकार्जुन खरगेंनी सांगितलं. प्रत्येक कुटुंबाला वार्षिक 3 लाख रुपयांची मदत देणार असून, लाडकी बहीण योजनासुद्धा आमची कॉपी केलीय. आम्ही कर्नाटकात दोन हजार रुपये आधीच दिलेत, असंही ते म्हणालेत.

## जोपर्यंत शक्य, तोपर्यंत राजकारणापासून बाजूला राहणार नाही- शरद पवार

■ मुंबई

शरद पवारांनी बारामतीत निवडणूक न लढण्याबद्दल विधान केले होते. त्यांच्या विधानानंतर निवृत्तिबद्दलच्या चर्चा सुरू झाल्या. याबद्दल एका मुलाखतीत त्यांना प्रश्न विचारण्यात आला. या विधानामागची भूमिका स्पष्ट करताना शरद पवारांनी त्यांच्या राजकीय निवृत्तीबद्दल भाष्य केले. शरद पवार यांनी मराठी वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी सविस्तर भूमिका मांडली. तुम्ही मध्यंतरी म्हटलात की तुम्हाला निवडणुकीच्या राजकारणात रस नाही. तुम्ही निवृत्तीचे संकेत दिले असे म्हटले गेले', असा प्रश्न शरद पवार यांना विचारण्यात आला. त्याला शरद पवारांनी उत्तर दिले. "मी तसं नाही म्हटलं. मी असं म्हटलं... मी सांगत हे होतो की, माझ्या कुटुंबाचा विषय होता तो. मी २५-३० वर्षे, माझ्यानंतर २५-३० आणि त्यानंतर पुढची २५-३० वर्षासाठी एक पिढी तयार करावी, ही माझी त्यातली इच्छा होती", असे शरद पवार म्हणाले. "आता माझ्या पुरता बोलत असताना मी हे सांगितलं की, मी आता निवडणूक लढणार नाही. हे आजच नाही, २०१४ पासून मी निवडणूक लढलो नाही. मी राज्यसभेवर गेलो. निवडणुकीला स्वतः उभं राहिलो नाही. माझ्या मतदारसंघात सुप्रिया उभी राहिली चार वेळा. म्हणजे थेट निवडणुकीच्या प्रक्रियेत मी थांबायचं ठरवलं आहे", असे शरद पवार म्हणाले. "मी आता हा विचार करतोय की, माझी दोन वर्षांनी टर्म संपेल. त्यावेळी विचार करूया की, जायचं की नाही. याचा अर्थ ज्या पद्धतीने मांडलं गेलं की, हे असे असे संकेत आहेत. प्रश्न असा आहे की, निवडणुका लढणं वेगळं आणि राजकारणात सातत्य ठेवणं वेगळं. मी राजकारण आणि समाजकारण यापासून बाजूला राहणार नाही. ते मी करतच राहीन जोपर्यंत मला शक्य आहे, तोपर्यंत", अशी भूमिका मांडत पवारांनी राजकारणात सक्रिय राहणार असल्याचे स्पष्ट केले.

## मुंबईत स्वत:चे घर नसलेला मी एकमेव मुख्यमंत्री-देवेंद्र फडणवीस

■ नागपूर

विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला आता अवघे १० दिवस उरले आहेत. १८ तारखेला प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. त्यापूर्वी सर्वच नेते जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील नागपूरमध्ये प्रचारात व्यस्त आहेत. नुकतेच मतदारांशी बोलताना त्यांनी भावनिक आवाहन केले. "मागच्या २५ वर्षांपासून मी आमदार आहे. पण अजूनही माझे मुंबईत स्वतःचे घर नाही आणि मला नागपूरकर असल्याचा अभिमान आहे", असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. देवेंद्र फडणवीस नागपूर दक्षिण या विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. २००९ पासून ते सलग निवडून येत आहेत.



"मी पंचवीस वर्ष विधानसभेत काम करत आहे, त्याच्यापूर्वी नगरसेवक आणि महापौर म्हणून काम केले. मात्र माझ्या या राजकीय वाटचालीत मी समाजासाठी काम करण्याचे एकमेव तत्व डोळ्यासमोर ठेवले. मी कधीच स्वतःचा विचार केला नाही. मी स्वत:चे घर भरण्याचा विचार केला नाही. मी स्वत:चा व्यवसाय किंवा शिक्षण संस्था उभी केली नाही. महाराष्ट्रात आजवर वीस मुख्यमंत्री झाले, या वीस मुख्यमंत्र्यांपैकी मी एकटा मुख्यमंत्री आहे, ज्याचे मुंबईत स्वतःचे घर नाही. आजही माझे घर नागपूरमध्येच आहे", असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीस हे २०१४ ते २०१९ या काळात भाजपा-शिवसेना युतीचे सरकार असताना मुख्यमंत्री होते. तसेच पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे ते महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री ठरले. २०२२ साली महाराष्ट्रात सत्तांतर झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री बनले. फडणवीस सध्या मुंबईत सागर या शासकीय बंगल्यात राहत आहेत. भाजपाने फडणवीस यांना पुन्हा एकदा नागपूर दक्षिण विधानसभेतून चौथ्यांदा उमेदवारी दिली आहे.

दरम्यान निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कोण होणार? अशी चर्चा आता राजकीय पक्ष आणि कार्यकर्त्यांमध्ये सुरू आहे. सध्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे महायुतीकडून मुख्यमंत्री आहेत. मात्र निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कोण असेल हे निकालानंतरच कळू शकेल, हे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह नुकतेच म्हणाले आहेत. याआधी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असतील असे बोलले गेले होते. मात्र सांगलीमधील शिराळा येथे भाषण करताना अमित शाह यांनी महायुतीसह देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा आणायचे असल्याचे विधान केले. त्यामुळे भाजपाला अधिका जागा मिळाल्या आणि महायुतीचे सरकार आले तर देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रमुख जबाबदारी येणार असल्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

## स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्यात महायुतीचे सरकार गरजेचे - शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे

### आनंदाचा शिधा, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना स्त्रियांचे जीवनमान उंचावणारे निर्णय

■ मुंबई




स्त्री शक्ती केंद्रा मार्फत दिनांक १० नोव्हेंबर रोजी वरळी येथील आदर्श नगर येथे महिला मेळावा व हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सहभाग घेतला. त्यावेळी त्यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधताना सांगितले की, स्त्रियांना संसार चालवताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने अनेकदा सणासुदीच्या दिवशी स्त्रियांना रेशन भरताना विचार करावा लागतो. यावर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी देखील, रोजच्या जीवनात नित्य उपयोगी असणाऱ्या किराणाचे दर स्थिर राहावेत यासाठी प्रयत्न केले मात्र अनेक वर्ष रेंगाळत पडलेली ही मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने त्यांच्या विचाराचा गांभीर्याने विचार करून 'आनंदाचा शिधा' ही संकल्पना राज्यभर राबवली आणि सणासुदीच्या दिवशी गोरगरीब जनतेला मोफत शिधा वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा फायदा हा स्त्रियांना संसार चालवताना निश्चितपणे झाला आहे. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून महिलांना आर्थिक बळ मिळावे याकरिता 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना राबविण्यात आली आणि त्यातून अनेक स्त्रियांचे जीवनमान उंचावण्यासाठी हातभार लागला आहे. आगामी काळात देखील स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राज्यभरात लागू करण्यात येतील त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारला पुन्हा राज्याच्या सत्तेत बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यभरातून महायुतीचे उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून द्यावेत असे आवाहन शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाचे आयोजन स्त्री शक्ती केंद्र अध्यक्ष ॲड. सुशिबेन शाह यांनी केले होते. यावेळी माजी नगरसेवक दत्ता नरवणकर, शिवसेना माजी नगरसेविका रत्ना महाले, समन्वयक प्रशांत गवस, युवती सेना निकिता घडशी, कीर्ती पांचाळ, विकास कोळी हे उपस्थित होते.

मराठी अक्रॉस मुंबई

## लाडकी बहीणच तुम्हाला धडा शिकवेल- बच्चू कडू

■ गोंदिया

लाडकी बहीण योजनेचा पैसा कुणाच्या बापाचा नाही. सर्वसामान्य जनता कष्टाच्या पैशातून टॅक्स भरते त्या मेहनतीचा पैसा आहे, असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. खासदार धनंजय महाडिक यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. याशिवाय बच्चू कडू यांनी प्रफुल पटेल यांना देखील सुनावलं आहे.

भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांनी वादग्रस्त वक्तव्य केलं असून लाडकी




बहीण योजनेच्या लाभार्थी हे काँग्रेसच्या सभेमध्ये दिसत असतील तर त्यांचे फोटो काढा आणि आम्हाला सांगा आम्ही त्यांची व्यवस्था करु असं म्हटलं होतं. त्यावर बोलताना प्रहार जनशक्ती पक्षाचे बच्चू कडू म्हणाले की हा पैसा का त्यांच्या बापाचा नाही. सर्वसामान्य नागरिक जे टॅक्स भरतात त्याचा हा पैसा आहे, त्यांच्या बापाचा हा पैसा नाही. लाडकी बहीण योजना कोणी मागितली होती,आम्ही दुधाला भाव मागितला. आम्ही धान पिकाला भाव मागितला होता. पण ते सरकारला जमलं नाही. मतासाठी लाडकी बहीण योजना सुरू करता ही लाडकी बहीण तुम्हाला आता धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही अशी खणखणीत टीका त्यांनी धनंजय महाडिक यांच्यासह राज्य सरकारवर केली आहे.

## ...पण त्यांनी रायगडावरचे टकमक टोक बघितले नाही - उद्धव ठाकरे

■ सांगोला

महाविकास आघाडीने प्रचार सभांचा धडाका उडवला आहे. महायुतीचं असलेलं आव्हान मोडून काढण्यासाठी जमेल तितक्या मतदारसंघात पक्षनेतृत्त्व पोहोचत आहेत. शिवसेना (उध्दव ठाकरे) यांनीही महाराष्ट्र दौऱ्याला सुरुवात केली असून विविध मतदारसंघ पालथे घातले आहेत. आज ते सांगोला विधानसभेचे अधिकृत उमेदवार दीपक पाटील यांच्या प्रचारार्थ सांगोला येथे गेले होते. तेथे त्यांनी प्रबोधनकार ठाकरे आणि संत गाडगे महाराज यांच्यामधील एक किस्सा सांगितला.

संत गाडगेबाबा यांचं चरित्र माझ्या आजोबांनी (प्रबोधनकार ठाकरे) यांनी लिहिल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले. ते पुढे म्हणाले, “माझा तेव्हा जन्मही झाला नव्हता आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे तेव्हा ऐन तारुण्यात होते. त्यावेळी गाडगेबाबा आमच्या घरी यायचे. पण आजोबा नेहमी सांगायचे की ते घरी आले की आत येऊन सोफ्यावर बसायचे नाहीत.



घरी आले की दरवाजाबाहेर बसायचे. माझ्या माँ ला हाक मारायचे. अगं सुनबाई काहीतरी भाकर तुकडा असेल तर दे, असं म्हणायचे. मग त्या म्हणायच्या की आत या. तर ते म्हणायचे मी बाहेरच ठीक आहे. तेवढ्यात माझ्या माँ काहीतरी बनवायला घ्यायच्या. तर ते म्हणायचे आता नको बनवू. तुझ्याकडे काही शिळं-पाकं असेल तर दे. त्यावर माँ म्हणायच्या, तुम्हाला शिळं कसं देणार? तर ते म्हणायचे, मला तेच पाहिजे. मग घरात काही असेल तर माँ त्यांना द्यायची. घराबाहेर झाडं होती, त्याखाली बसून ते खायचे”, असा प्रसंग उद्धव ठाकरेंनी सांगितला.

“मला गद्दारांच्या छाताड्यांवर पुन्हा भगवा गाडायचा आहे. महाराष्ट्राचा इतिहास आहे. महाराष्ट्र कधीही गद्दारांना क्षमा करत नाही. मला गद्दारांना सांगायचे की त्यांनी गुवाहाटीचा डोंगर बघितला, पण त्यांनी रायगडावरचे टकमक टोक बघितले नाही. ते त्यांना २३ तारखेला दाखवायचे आहे”, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटावर केली. रेल्वेत कुणाची ओळख असेल तर त्यांनी मला २३ तारखेचे गुवाहाटीचं तिकीट काढून द्यावे, कारण एकाला तिकडे पाठवायचे आहे. मग त्यांनी तिथे झाडे मोजत बसावे. असे टोलाही त्यांनी लगावला.

## राजेश लाटकरांसाठी मालोजीराजे आणि मधुरिमाराजे मैदानात

■ कोल्हापूर

कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस उमेदवार मधुरिमाराजे यांनी ऐनवेळी माघार घेतल्याने मोठा वाद झाला होता. दरम्यान, राजेश लाटकर या कार्यकर्त्यावर अन्याय व्हायला नको म्हणून आम्ही माघार घेतल्याचे खासदार शाहू महाराज यांनी स्पष्ट केलं होते. आता उत्तर कोल्हापुरात राजेश लाटकर हेच महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत. दरम्यान, मोठ्या वादानंतरही मालोजीराजे आणि मधुरिमाराजे महाविकास आघाडीचे उमेदवार राजेश लाटकर यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. त्यांच्या नवीन राजवाड्यावर माजी सतेज पाटील यांच्या उपस्थितीत पार बैठक पडली. यावेळी मालोजीराजे आणि मधुरिमाराजे यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

मालोजीराजे म्हणाले, खासदार छत्रपती शाहू महाराज यांना पहिल्यापासून सामान्य घरातल्या कार्यकर्त्याला संधी मिळाली, असे वाटत होते. मात्र कार्यकर्त्यांच्या तीव्र भावना असल्याने आम्ही काँग्रेसकडून उमेदवारी अर्ज भरला होता. अनेक घडामोडीनंतर उमेदवारी अर्ज मागे घेऊन सर्वसामान्य कार्यकर्त्याच्या पाठीशी उभे राहून राजेश लाटकर यांना आमदार करण्याची भावना श्रीमंत खासदार शाहू महाराज यांनी व्यक्त केली होती.

छत्रपती शाहू महाराज यांच्या आदेशानुसार माजी आमदार छत्रपती मालोजीराजे गट व काँग्रेसचे कार्यकर्ते जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजय करण्यासाठी आज पासून सक्रिय होतील. तसेच कोल्हापूर उत्तर मतदारसंघात काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट,शिवसेना उद्धव ठाकरे गट पुरस्कृत राजेश लाटकर यांना निवडून आणण्यासाठी माजी आमदार छत्रपती मालोजीराजे आणि मधुरिमा राजे छत्रपती यांच्यासह सर्व कार्यकर्ते आज पासून ताकतीने प्रचारात उतरतील असा विश्वास माजी आमदार छत्रपती मालोजीराजे यांनी व्यक्त केला.

## पोलीस महासंचालकांच्या नियुक्तीवरुन काँग्रेसचे निवडणूक आयोगाला पुन्हा पत्र

■ मुंबई

महाराष्ट्र पोलीस महासंचालक पदावरुन आता पुन्हा एकदा राजकारण तापताना दिसत आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर काँग्रेसकडून तत्कालीन पोलीस महासंचालिका रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात यावी, या मागणीसाठी निवडणूक आयोगाला पत्रव्यवहार करण्यात आला होता. यानंतर आता निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार, रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आल्यानंतर काँग्रेसने पुन्हा एकदा निवडणूक आयोगाला पत्र पाठवत महत्त्वाची मागणी केली आहे. महाराष्ट्र सरकारने संजय कुमार वर्मा यांची पोलीस महासंचालक म्हणून सशर्त नियुक्ती करण्याची कृती ही घटनात्मक तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि स्थापित प्रशासकीय तत्त्वे यांचे उघड उघड उल्लंघन करणारी आहे, असा आरोप काँग्रेसने केला आहे. यामुळे पोलीस महासंचालकांना निवडणुकीच्या काळात तटस्थ आणि निष्पक्षपणे काम करण्यात अडचणींचा सामना करावा लागले म्हणून निवडणूक आयोगाने आपल्या अधिकाऱ्यांचा वापर करून संजय वर्मा यांच्या तात्पुरत्या नियुक्तीच्या आदेशावर त्वरीत निर्णय घ्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

“निवडणूक आयोगाने 5 नोव्हेंबर 2024 रोजी राज्यघटनेच्या कलम 324 अंतर्गत घटनात्मक अधिकाराचा वापर करत संजय कुमार वर्मा यांची महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक पदी कोणत्याही अटींशिवाय नियुक्तीचे स्पष्ट आदेश दिले आहेत. निवडणूक प्रक्रियेदरम्यान पोलीस दलाची निष्पक्ष आणि तटस्थ भूमिका असावी यासाठी ही नियुक्ती केली होती. पण निवडणूक आयोगाच्या या निर्देशाचे उल्लंघन करत महाराष्ट्र सरकारने संजय वर्मा यांची नियुक्ती आचार संहितेपर्यंतच करणारा आदेश काढला. असा एकतर्फी फेरफार हा निवडणूक आयोगाच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे”, असा आरोप नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात केला आहे.

“सर्वोच्च न्यायालयाने प्रकाशसिंह आणि इतर विरुद्ध भारत आणि इतर संघ प्रकरणी ऐतिहासिक निकाल देताना डीजीपींच्या नियुक्तीसाठी मार्गदर्शक तत्वे, योग्यता आणि राजकीय प्रभावापासून संरक्षण यासंबंधाचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत, त्याचेही महाराष्ट्र सरकारने उल्लंघन केलेले आहे. संजय वर्मा यांच्या सशर्त नियुक्तीमुळे पोलिस दलाचे नेतृत्व आणि प्रशासकीय सातत्य धोक्यात येते. रश्मी शुक्ला यांना निवडणुकीनंतर पुन्हा डीजीपीपदी नियुक्त करण्याचा राज्य सरकारचा काही इरादा असेल तर तो कायदेशीर आणि प्रशासकीय गुंता निर्माण करणारा ठरू शकतो”, असं नाना पटोले पत्रात म्हणाले आहेत.

## दोन्ही ठाकरेंना शिवाजी पार्क मिळणार नाही

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांची तोफ राज्यात सगळीकडे धडाडत असतानाच शिवाजी पार्कवर मात्र ठाकरेंची सभा होणार नाही आहे. यंदाच्या निवडणुकीत शिवाजी पार्कवर उद्धव ठाकरे किंवा राज ठाकरे यापैकी कोणाचीही सभा होणार नाही . त्यामुळे ठाकरेंचे शिवाजी पार्कसोबत असलेले अतूट नाते यावेळी बघायला मिळणार नाही. याला शिवाजी पार्क वापरण्याचा एक नियम आडवा आला आहे. विविध सभा आणि कार्यक्रमांना शिवाजी पार्कचे मैदान वर्षातून ४५ दिवस वापरण्याचीच मुभा आहे. हा ४५ दिवसांचा कालावधी संपलेला असल्याने आता या ठिकाणी कार्यक्रम अथवा सभा घेता येणार नाही. तर दुसरीकडे महायुतीच्या मात्र ३ सभा शिवाजीपार्कवर होणार आहेत.

## गाझा पट्टीत हवाई हल्ला; २४ तासांत ४७ ठार

■ गाझा

गाझा पट्टी पुन्हा एकदा हवाई हल्ल्याने हादरली आहे. सातव्या महिन्यात आठव्यांदा मध्य गाजामध्ये एका रुग्णालयावर हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात तीन जणांचा मृत्यू झाला होता. एक स्थानिक पत्रकार देखील गंभीर जखमी झाला होता. अशाच प्रकारे मागील २४ तासांत केलेल्या हल्ल्यात ४७ फिलिस्तानी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तर शेकडो लोक जखमी झाले आहेत. गाझाच्या दीर अल



बलाहमधील अल-अक्सा रुग्णालयात हल्ला झाल्यानंतर लोक भीतीने घाबरून सैरावैर घाबरू लागले. हेलिकॉप्टरमधून गोळीबार करण्यात आला. इस्त्रायली सैन्याचं म्हणणं आहे की, स्थलांतरांना आश्रय देणाऱ्या एका छावणीवर गोळीबार करण्यात आला. यामध्ये दोन फिलिस्तानी नागरिक मारले गेले.

इस्त्रायल सैन्य दलाने पुढे म्हटलं की, 'रुग्णालय परिसरात हमासचे सैनिक लपले होते. त्यांच्यावर हल्ला करण्यात आला आहे. फिलिस्तानच्या आरोग्य मंत्रालयाचं म्हणणं आहे की,'रुग्णालय परिसरात हमासचा कोणताही सैनिक नव्हता. यावेळी रुग्ण आणि शरण आलेले लोक होते. इस्त्रायलने याच लोकांवर हल्ला केला.

## आमच्या कार्यकर्त्यांना हात लावाल तर याद राखा... बर्फाच्या लादीवर झोपवेल
## आदित्य ठाकरेंचा नांदगावात इशारा

■ नाशिक

नाशिक जिल्ह्यातील नांदगाव विधानसभा मतदारसंघात आदित्य ठाकरे यांनी प्रचारसभेला संबोधित केलं. यावेळी आदित्य ठाकरेंनी नांदगावचे पक्षाचे उमेदवार गणेश धात्रक यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. नांदगावच्या जागेवर आपला उमेदवार जिंकणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गद्दाराला आणि गुंडागर्दी करणाऱ्यांना सांगणं आहे, राज्यात आमची सत्ता येणार आहे. जर इथे त्या दोघांनी, कुठल्याही गुंडांनी एका व्यक्तीला हात लावला तर याद राखा, बर्फाच्या लादीवर झोपल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा दिला. तुम्हाला असलेली मस्ती घरात दाखवा, जनतेसमोर हे चालणार नाही, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं.

आपलं सरकार आल्यानंतर गेल्या दोन वर्षात स्थानिक जनतेवर अन्याय करणाऱ्यांना उत्तर देऊ, असं आदित्य ठाकरे म्हणाले. 20 तारखेला महाराष्ट्रात मशाल पेटणार, शरद पवारांची राष्ट्रवादी लढतेय तिथं तुतारी वाजणार, काँग्रेस असेल तिथं हात दिसणार, असं आदित्य ठाकरे म्हणाले. भयमुक्त महाराष्ट्र आपल्याला घडवायचा आहे. आपल्याला एकत्र यावंच लागेल, असंही ते म्हणाले.

पन्नास खोके एकदम ओके, यांना आता नॉट ओके करायचे आहे. या गद्दारांना तिकीट कोणी दिले, यांना निवडून कोणी आणले? तुम्ही निवडून आणलं पण तुमच्यावर आवाज चढवतात हे चालणार नाही, असं आदित्य ठाकरे म्हणाले. महाराष्ट्रात महाविकास आघडीचे बहुमताचे सरकार येणार आहे, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं. सरकार कडून अन्याय होतोय,



भाजप शेतकऱ्यांवर अन्याय करते आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले तेव्हा 2019 ला महाविकास आघाडीचे सरकार आलं होतं तेव्हा शेतकरी कर्जमुक्ती केली, त्याची बॅनरबाजी केली नव्हती, असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं. आज 1500 रुपये देतात, 2014 ला भा 15 लाख देणार होते, असं आदित्य ठाकरे म्हणाले. आमचं सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांचं तीन लाख रुपयांपर्यंतचं कर्ज माफ केलं जाईल, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

गारपीट, अवकाळी पाऊस, दुष्काळ असेल, करोना होता तेव्हा मविआचे मंत्री गावोगावी यायचे. जेवढी शक्य असेल तेवढी मदत करण्यात आली, असं आदित्य ठाकरे म्हणाले. आदित्य ठाकरे यांनी यावेळी कृषी मंत्र्यांचं नाव विचारलं.जनतेला कृषीमंत्री कोण आहे हे माहिती नाही, हे किती भयानक आहे , याचा विचार करा, असं आदित्य ठाकरे म्हणाले. नोटबंदीमुळं शेतकरी, तरुणांचे हाल झाले. गृहिणींचे हाल झाले, असं आदित्य ठाकरे म्हणाले. यावेळी त्यांनी महागाई परवडणारी आहे का असा सवाल देखील केला. महागाईच्या काळात दरमहा कोणीतरी 1500 रुपये देणार याचा उपयोग काय असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला.

## मी संधीसाधू तर शरद पवार कोण? अशोक चव्हाणांचा प्रतिसवाल

■ नांदेड

भाजप खासदार आणि नांदेडचे नेते अशोक चव्हाण हेही जिल्ह्यातील राजकारणात निवडणुकांच्या अनुषंगाने सक्रीय झाले आहेत. भाजपा महायुतीचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी त्यांनी कंबर कसली आहे. दुसरीकडे लोकसभा पोटनिवडणुतही भाजप महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्याचे लक्ष्य त्यांच्यापुढे आहे. त्यामुळे, विधानसभा व लोकसभा निवडणुकीसाठी अशोक चव्हाण मोट बांधत आहेत. त्याच अनुषंगाने पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेबद्दल प्रतिक्रिया दिली. तसेच, शरद पवारांनी केलेल्या टीकेवरही पलटवार केला आहे. अशोक चव्हाण हे संधीसाधू



असल्याची बोचरी टीका शरद पवारांनी केली होती. आता, शरद पवारांच्या टीकेला अशोक चव्हाणांनी प्रत्युत्तर दिलंय. मी संधीसाधू तर शरद पवार कोण, याचंही उत्तर त्यांना द्यावं लागेल, असे चव्हाण यांनी म्हटलं.

चव्हाण कुटुंबीयांना काँग्रेसने मुख्यमंत्रीपद, देशाचे गृहमंत्रीपद, अर्थमंत्रीपद, संरक्षणमंत्रीपद दिले. स्वत: अशोक चव्हाण यांना मुख्यमंत्रीपद दिले, अजून काय द्यायचे असा सवाल करत राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी भाजप खासदार अशोक चव्हाण यांच्यावर टीका केली. तसेच, काही महिन्यांपूर्वी काँग्रेसमधून भाजपात गेल्याने, अशोक चव्हाण हे संधीसाधू असल्याची बोचरी टीकाही शरद पवारांनी केली होती. आता, शरद पवारांच्या टीकेला अशोक चव्हाणांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

शरद पवार नेमकं काय म्हणाले हे मला माहित नाही, पण शरद पवार खूप ज्येष्ठ नेते आहेत. त्यांनी माझ्यासारख्या लहान माणसावर वक्तव्य केलं असेल असं मला वाटत नाही, असे अशोक चव्हाण यांनी म्हटले. त्यानंतर, मी जर संधी साधू आहे, तर मग पवार साहेब काय आहेत? या प्रश्नाचे उत्तर सुद्धा शरद पवार यांना द्यावं लागेल, अशा शब्दात अशोक चव्हाण यांनी शरद पवारांवर पलटवार केला आहे.

## बहिणींना पंधराशे देऊन घरी बसवली, हा विकास आहे? - उद्धव ठाकरे

### मोदी - शहांनी अवघा महाराष्ट्र लुटला

प्रतिनिधी
■ नांदेड

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट हल्ला चढवला. नरेंद्र मोदी व अमित शहा यांनी अवघा महाराष्ट्र लुटला. त्यानंतर आता ते महाराष्ट्रात मते मागण्यासाठी जागोजागी फिरत आहेत, असे ते म्हणालेत. मुलगी शिकली, प्रगती झाली आणि पंधराशे देऊन घरी बसवली, हा विकास आहे का? असा उपरोधिक टोलाही त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवर



निशाणा साधताना हाणला.

उद्धव ठाकरे यांची शनिवारी नांदेड जिल्ह्यातील लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघात सभा झाली. या सभेत त्यांनी भाजप महायुतीवर विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट टीका केली. ते म्हणाले, नरेंद्र मोदी व अमित शहांना आता महाराष्ट्राची आठवण झाली आहे. आतापर्यंत त्यांना महाराष्ट्र केवळ लुटण्यासाठी आहे असे वाटत होते. पण आता महाराष्ट्रातील लोकांना मतदानाचा अधिकार आहे हे त्यांच्या लक्षात आले आहे. त्यानुसार आता ते इथे येऊन मतांचा जोगवा मागत आहेत.

या लोकांनी महाराष्ट्राचे सर्व उद्योग लुटून गुजरातला नेता आणि आता निर्लज्जपणे महाराष्ट्राची मते मागता? तुम्हाला काय वाटते? तुम्ही काही केले तरी चालले आणि महाराष्ट्र केविलवाणेपणाने मत देईल? ही लढाई केवळ उद्धव ठाकरे व शिवसेनेची नाही. आपल्याला सत्ता पाहिजे. पण हे सर्व केवळ महाविकास आघाडीसाठी नाही तर येथील सर्वसामान्य जनतेसाठी आपल्याला सत्ता हवी आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, भाजपने आता बटेंगे तो कटेंगे असा नारा दिला आहे. कोण कापणारे आहेत? जे काही कापणारे आहेत ते तुमच्यासोबत सत्तेत बसलेले आहेत. त्यांनी माझ्या एका कार्यकर्त्याचे केवळ फेसबुक पोस्ट टाकली म्हणून बोटे कापली. ज्यांनी माझ्या कार्यकर्त्याची बोटे कापली, त्यांना आम्ही आता राजकारणात कापणार आहोत, असे उद्धव ठाकरे यावेळी माजी खासदार तथा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांना इशारा देत म्हणाले. चिखलीकर यांच्यावर ठाकरे गटाच्या एका कार्यकर्त्याची बोटे छाटल्याचा आरोप आहे.

मोदी येथे आले तर त्यांना हा माझा बोटे कापलेला कार्यकर्ता दाखवा. त्यांना विचारा कोण आहे हा? काय त्याचा गुन्हा? विरोधात पोस्ट टाकली म्हणून त्याचे बोटे छाटता? त्याने तर पोस्ट टाकली, मी तर तुमच्याविरोधात उघडपणे बोलत आहे, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोटे छाटलेल्या पीडित कार्यकर्त्याला आपल्याजवळ बोलावले. तसेच त्याला त्याच्यावर बेतलेल्या प्रसंगाचा बदला मी स्वतः घेणार, असा धीरवजा शब्द त्याला दिला.

## बहिणींनी लोकसभेत दणका दिला, म्हणून त्या लाडक्या झाल्या

### सुप्रिया सुळेंचा खोचक टोला

प्रतिनिधी
■ लातूर

राज्यातली सगळ्यात जास्त लाडकी बहीण मी आहे. पण लोकसभेत असं नव्हतं. लोकसभेच्या निवडणुकीत सगळ्या बहिणींनी जोरात दणका दिल्यानंतर सगळ्या बहीणी लाडक्या झाल्या आहेत, अशी उपरोधक टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. आज लातूर जिल्ह्यात प्रचारसभेच्यावेळी त्यांनी महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेवर हल्लाबोल केला. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर बहिणींना पैसे दिले, मात्र महागाई वाढवली असंही सुळे यांनी यावेळी बोलताना म्हंटलं आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व पक्षांकडून प्रचारसभांचा जोर वाढला आहे. लातूर



ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख यांच्या प्रचारासाठी शनिवारी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांची महिला मेळावा आणि जाहीर सभा पार पडली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी भाजप आणि महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदी यांच्या ‘एक है तो सेफ है’ या नाऱ्यावर देखील त्यांनी टीका केली आहे.

‘छत्रपती आणि शाहू, फुले यांच्या महाराष्ट्रामध्ये अशी भाषा सातत्याने वापरली जाते आणि आता त्यांच्याकडे काहीच मुद्दे नाहीत, त्यामुळे हा देखील प्रयोग आहे. मात्र महाराष्ट्राने या आधी देखील लोकसभेला अशा विचारधारेचा निषेध केला आहे. आत्ताही करेल’, असंही सुप्रिया सुळे यांनी यावेळी बोलताना म्हंटलं आहे. छगन भुजबळ यांनी केलेल्या ईडीच्या वक्तव्यावर बोलताना आपल्या बोलण्याचा शिक्कामोर्तब त्या पुस्तकातून झालेलं असून याची शक्यता नाकारता येत नाही, असं म्हंटलं.

## भाजप आमदाराला प्रश्न विचारल्यामुळे समर्थकांची दोघांना बेदम मारहाण

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

राज्यात विधानसभा निवडणुकीमुळे उमेदवारांनी प्रचारसभांचा धडाका लावला आहे. उमेदवारांकडून दिवस-रात्र प्रचार सुरु आहे. राज्याती सर्वच जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. छत्रपती संभाजीनगर मतदारसंघातही विधानसभा निवडणुकीमुळे रंगत वाढली आहे. याच ऐन निवडणुकीत छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजप उमेदवार प्रशांत बंब यांच्या प्रचारसभेत गोंधळ झाल्याची घटना समोर आली.

छत्रपती संभाजीनगरमधील गंगापूर विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजप उमेदवार प्रशांत बंब यांच्या



कार्यक्रमांमध्ये गोंधळ झाला. गंगापूर तालुक्यातील गवळीशिवरा येथे प्रशांत बंब यांची सभा होती. या सभेमध्ये आकाश केरे आणि योगेश केरे या दोन तरुणांनी प्रशांत बंब यांना विकास कामाबद्दल प्रश्न विचारल्यानंतर बंब यांच्या समर्थकांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सध्या ही व्हिडिओ क्लिप सोशल मीडियामध्ये व्हायरल होत आहे. या घटनेनंतर प्रशांत बंब यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत.

हे सर्व महाविकास आघाडीचे उमेदवार सतीश चव्हाण हे घडवून आणताहेत. या एकाच कार्यक्रमात नाही तर आत्तापर्यंत १३ कार्यक्रमात असा गोंधळ घालण्याचा प्रयत्न झाला. मी काय काम केली आहेत, हे जनतेपर्यंत जाऊ नये म्हणून ठरवून गोंधळ घातला जातोय, असे प्रशांत बंब यांनी सांगितले आहे.

## एसटी बसच्या धडकेत प्रवासी तरुणाचा मृत्यू

■ पुणे

स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात बसच्या धडकेत प्रवासी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी एसटी बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. प्रवीण बालाजी कोका (वय २८, रा. हैद्राबाद, तेलंगणा) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत अमर चकराल (वय ४४, रा. बिबवेवाडी) यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार एसटी बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवीण कोका सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ परिसरात कामाला आहे. तो दिवाळीनिमित्त बिबवेवाडीत राहणाऱ्या आत्याला भेटायला आला होता. शुक्रवारी सकाळी आठच्या सुमारास तो सोलापूरहून आलेल्या बसमधून एसटी स्थानकात उतरला. तेथून तो बिबवेवाडीकडे निघाला होता.

## 'खटाखट' वाजवायला दरवाजा आहे काय?

### राहुल गांधींच्या टीकेला अजित पवारांचं 'खटाखट' उत्तर

प्रतिनिधी
■ सांगली

विधानसभा निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांनी विविध योजनांची घोषणा केली आहे. महाविकास आघाडीने जाहीर प्रचारसभेत पंचसूत्रीच्या नावाखाली योजना जाहीर केल्या. मुंबईतील बीकेसी येथे झालेल्या जाहीर सभेत महाविकास आघाडीने योजना जाहीर केल्या. यावेळी राहुल गांधी यांनी महिलांना सत्ता आल्यानंतर महालक्ष्मी योजनेअंतर्गत खटाखट खात्यात पैसे जमा होतील, असे वक्तव्य केलं होतं. राहुल गांधींच्या वक्तव्यानंतर अजित पवारांनी टीका केली आहे. खटाखट वाजवायला दरवाजा आहे काय? असा सवाल करत अजित पवारांनी टीका केली.



राज्य सरकारच्या योजनेवरून भाष्य करताना अजित पवार म्हणाले,'तुम्हाला योजनेचे पैसे दिले, यामुळे विरोधक टीका करतात. आम्ही काय मूर्ख आहेत का? आता निवडून येणार नाही. त्यामुळे असं काही सांगायचे की लोक बावळून गेली पाहिजेत. मला महाराष्ट्राच्या जनतेला सांगायचं आहे की, त्यांचा सगळा चुनावी जुमला चालू आहे. आपल्या राज्याचे वाटोळं करण्याचे काम चालले आहे'.

अजित पवारांनी यावेळी राहुल गांधींची टिंगल उडवली. अजित पवार म्हणाले, 'काल काँग्रेसचे एक दिल्लीतले नेते आले. त्यांनी सांगितले आम्ही खटाखट देतो. अरे कुठलं खटाखट? अरे दरवाजा वाजवताय का? खटखट वाजवायला? असं कुठे नोटा येतात का? अरे काय तुम्ही देशाचे विरोधी पक्ष नेते आहात'. 'आम्हाला बनवता? आम्ही काय गोट्या खेळायला आलोय का? आम्ही स्पष्ट बोलणारे आहोत. खऱ्या गोष्टी सांगणारे आहोत. योजना पूर्ण करण्याचे धमक आणि ताकत लोकप्रतिनिधींमध्ये असावी लागते. राष्ट्रवादी घडाळयाला मत द्या,इस्लामपूर मतदारसंघाचा चेहरा मोहरा पाच वर्षात बदलला नाही,तर नावाचा अजित पवार सांगणार नाही, असे ते म्हणाले.

# ९३ टक्के विद्यार्थ्यांनी दिली टीईटी परीक्षा

■ मुंबई

राज्यभरात शिक्षक पात्रता परीक्षा सुरळीत पार पडल्याचा दावा राज्य परीक्षा परिषदेकडून करण्यात आला असून रविवारी झालेल्या दोन्ही पेपरला सरासरी ९३ टक्के विद्यार्थ्यांनी उपस्थिती होती. सर्वच केंद्रावर परीक्षा किरकोळ तक्रारी वगळता पार पडली, अशी माहिती परिषदेकडून देण्यात आली तीन वर्षानंतर रविवारी झालेल्या या परीक्षेसाठी राज्यभरातून ३ लाख ३५ हजार ९३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी होती. गेल्या काही परीक्षेत घडलेल्या पेपर फुटीच्या घटना तसेच झालेला गैरव्यवहार यामुळे या परीक्षेसाठी सर्वच परीक्षा केंद्रावर कडक उपाययोजना करण्यात आल्या होत्या. १ हजार २३ परीक्षा केंद्रांवर टीईटी परीक्षा पार पडली. प्रत्येक विद्यार्थ्यांची तपासणी केल्यानंतरच त्याला परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येत होता. विद्यार्थ्यांची फेस रीडिंग तसेच बायोमेट्रिकच्या माध्यमातून तपासणी करण्यात येत होती. अर्ज भरताना दिलेल्या माहितीनुसार ही फेस रिंडींग तपासणी केली जात होती.

प्रत्येक परीक्षा केंद्रातील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले त्यानुसार पाहणी करण्यात येत होती. एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कोणत्याही गैर हालचाली झाल्यास तात्काळ तपासणी करण्याचीही यंत्रणा यंदा या परीक्षेत होती. प्रथमच एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. विद्यार्थी हालचालीवर नजर ठेवण्यात आली. याबाबतची खातरजमा आता नंतर करण्यात येणार आहे. संशयास्पद हालचाली आढळल्यास त्या उमेदवारावर कारवाईही होणार आहे.

परीक्षा केंद्रात प्रवेश करतानाच सर्वच उमेदवारांची मेटल डिटेक्टरने कसून तपासणी करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याने परीक्षेपूर्वी दीड तास आधी परीक्षा केंद्रावर हजर राहणे बंधनकारक करण्यात आले होते. यामुळे परीक्षेच्या अगोदर दोन तास उमेदवार पोहचले होते. त्यामुळे उशिरा आलेल्या उमेदवारांना प्रवेश नाकारण्यात आला.

मुंबईतून २६ हजार ५५९ इतक्या उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९० टक्केहून अधिक जणांनी परीक्षा दिली. मुंबईतून ७ हजार ३७७, रायगडमधून ३ हजार ९८, ठाणे १० हजार १७८, पालघर मधून ५ हजार ६०६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती त्यापैकी सरासरी ८० ते ९० टक्केहून अधिक विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती.

# निवडणुकीचे साईड इफेक्ट; कामासाठी मिळेनात मजूर

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीचे वारे जोरात वाहू लागले आहेत. रिंगणात उतरलेल्या उमेदवारांकडून प्रचार रॅली, सभांसह मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध माध्यमांतून प्रयत्न सुरू आहे. यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता भासत असल्याने हजारो हातांना काम मिळाले आहे. तर मंडप व्यावसायिक, वाहनमालकांनाही 'अच्छे दिन' आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मुंबई आणि विविध जिल्ह्यांमध्ये असलेल्या नाक्यावरती काम करणारे नाका कामगार देखील आता मिळेनासे झाले आहेत. राज्यातील स्किल आणि अनस्कील कामगार मिळण्याची ठिकाण सध्या ओस पडली आहे. दीपावली सण झाल्यानंतर छोटी मोठी काम करण्यासाठी लागणारे मजूर हे नाक्या नाक्यावर उपलब्ध असतात. परंतु गेल्या काही दिवसांपासून हे मजूर गायब आहेत. निवडणुकीच्या प्रचारामध्ये, रॅलीमध्ये मनुष्यबळ , कार्यकर्त्यांचा संख्याबळ दिसावं यासाठी माणसांची गरज मोठ्या प्रमाणात भासत असते. त्यामुळे उमेदवारांकडून नाक्या नाक्यावर उभे असलेले हे मजूर सकाळ सकाळ बोलून घेतले जातात आणि दिवसभरासाठी प्रचार रॅलीमध्ये वापरले जातात. या कामगारांमध्ये सुतार काम, रंगारी, बिगारी काम करणारे तसेच त्यांच्या हाताखाली काम करणार लोक असतात. परंतु सध्या हे कामगार देखील मिळणे दुरापास्त झाले आहे.

**यांनाही मिळाला रोजगार**

अलीकडच्या काळात बेरोजगारीचा प्रश्न गंभीर बनला आहे. हाताला काम नसल्याने स्थलांतराची वेळ येत आहे. परंतु, सध्या विधानसभा निवडणुकीमुळे मजुरांनाही 'अच्छे दिन' आले आहेत. प्रचार कार्याकरिता मनुष्यबळ लागत असल्याने मजुरांना रोजगार मिळाला आहे. त्यामुळे मजुरांचे अड्डे ओस पडलेले पाहायला मिळत आहेत.

# पात्र अर्जदारांना मिळणार स्वीकृतीपत्र

■ मुंबई

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) कोकण मंडळाच्या प्रथम येणाऱ्यास प्राधान्य योजनेतील पात्र अर्जदारांची घराची प्रतीक्षा अखेर संपली आहे. पात्र अर्जदारांना सोमवारपासून स्वीकृती पत्र वितरित करण्याचा निर्णय कोकण मंडळाने घेतला आहे.

म्हाडाच्या कोकण मंडळाने ११ हजार १७६ सदनिकांच्या विक्रीसाठी १० ऑक्टोबरला जाहिरात दिली होती. या घरांची विक्री प्रथम येणाऱ्यास प्राधान्य योजेनेंतर्गत करण्यात येत आहे. दर महिन्याच्या १५ तारखेला पात्र अर्जदारांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार होती. आचारसंहितेमुळे मंडळाला यादी प्रसिद्ध करण्यात आली नव्हती. त्यामुळे अर्जदारांना घर मिळण्यास विलंब होत होता.

यादी प्रसिद्ध झाली नसली तरी अर्जदारांना वाट पाहावी लागू नये यासाठी त्यांना स्वीकृती पत्र देण्याचा निर्णय कोकण मंडळाने घेतला आहे. स्वीकृती पत्राच्या आधारे पात्र अर्जदारांनी घर घेण्यासाठी संमती दर्शवणे आवश्यक आहे. स्वीकृती पत्र मिळालेल्या घरांपैकी ज्या घरांना निवासी दाखला मिळाला आहे अशा घरांसाठी देकार पत्र वितरित केले जाणार आहे.

# भरधाव वेगाने विक्रोळीत घेतला तरुणीचा बळी

■ मुंबई

दुचाकीवरून मैत्रिणीसोबत निघालेल्या मित्राचे दुचाकीवरील नियंत्रण सुटून झालेल्या अपघातात मेघा राजेंद्र शहाणे (२५) या तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. याप्रकरणी पंतनगर पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवत चेंबूरच्या इरफान अहमद रियाज अहमद खान (२८) याला अटक केली आहे.

घाटकोपर पोलिसांनी पोलिस शिपाई अनिल अशोक पवार यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवला आहे. ८ तारखेला रात्री पावणे आठच्या सुमारास मेघा इरफानसोबत दुचाकीवरून निघाली होती.

विक्रोळी वाहतूक पोलिस चौकीच्या ब्रीजवर ठाण्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहिनीवर आले असता इरफानचे धोकादायकरीत्या चालवत असलेल्या दुचाकीवरील नियंत्रण सुटून दुचाकीचा अपघात झाला.

या अपघातात खाली पडलेल्या मेघाच्या डोक्यावरून पाठीमागून येणारे वाहन गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने कुटुंबीयांना धक्का बसला आहे.

या घटनेनंतर इरफानने स्वतः पोलिस ठाण्यात हजर राहात घटनाक्रम सांगितला. त्यानुसार, पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवत कारवाई केली आहे.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचा आदेश देशात लागू करा

■ मुंबई

अंगणवाडी सेविका, मदतनिसांना वर्ग -३ व ४ चे शासकीय कर्मचारी म्हणून नियमित करण्याचा गुजरात उच्च न्यायालयाचा आदेश संपूर्ण देशात ताबडतोब लागू करावा, अशी मागणी अखिल भारतीय अंगणवाडी सेविका व मदतनीस फेडरेशनच्या (आयफा सिटू) राष्ट्रीय उपाध्यक्षा शुभा शमीम यांनी केली.

गुजरात उच्च न्यायालयाने दिलेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याच्या क्रांतिकारी निकालाचे आयफा तसेच अंगणवाडी कर्मचारी संघटना (महाराष्ट्र) स्वागत करीत आहे. उच्च न्यायालयाने केंद्र व गुजरात राज्य सरकारला अंगणवाडी सेविका व मदतनिसांना वर्ग ३ व ४ चे शासकीय कर्मचारी म्हणून नियमित करण्यासाठीचे धोरण आखून त्यांच्या सेवा नियमित कराव्यात, असा आदेश न्यायमूर्ती निखिल करियेल यांच्या एकसदस्यीय बेचने दिला आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना एकाच वेळी आरोग्य समुपदेशक, समन्वयक, जनसंपर्क व्यवस्थापक, कार्यक्रम व्यवस्थापक, लिपिक, पूर्व प्राथमिक शिक्षक अशी वेगवेगळ्या प्रकारची कामे करतात. त्यांचा व राज्य सरकारचा संबंध मालक व कर्मचारी असा आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवल्याचे त्यांनी सांगितले.

# 61 लाख उत्तर भारतीयांना मुंबईत आणण्यासाठी रेल्वेगाड्या अपुऱ्या



■ मुंबई

दिवाळी आणि छठपूजेसाठी महामुंबईतून रेल्वेने उत्तर भारतात आपल्या मूळ गावी गेलेल्या सुमारे ६१ लाख लोकांना आता परतीचे वेध लागले आहेत; परंतु, ते २० तारखेपूर्वी परतले नाही तर त्यांना मतदानाला मुकावे लागेल. लाखो उत्तर भारतीय महाराष्ट्रात स्थायिक झाल्याने ते राज्याचे मतदार आहेत. मुंबईत उत्तर भारतीय मतदारांचा प्रभाव अनेक मतदारसंघांमध्ये आहे.

महाराष्ट्रात मतदानाला अवघे नऊ दिवस उरले आहेत. निवडणुकीचा प्रचारही जोरात सुरू आहे; परंतु इतक्या कमी कालावधीत लाखो उत्तर भारतीयांना मतदानाआधी राज्यात परत आणणे कठीण असल्याचे सांगितले जाते. रेल्वेच्या आकडेवारीनुसार १ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत मध्य आणि पश्चिम रेल्वेने मुंबई विभागातील ६१ लाख २७ हजार ९६० लोक उत्तर भारतात गेले आहेत. गावी गेलेल्यांना परत आणण्यासाठी रेल्वेला अधिकाधिक अनारक्षित विशेष गाड्या चालवाव्या लागणार आहेत. उत्तर भारतातील आपल्या लहान-छोट्या गावी गेलेले हे नागरिक राज्यातील मोठी व्होट बँक आहे. त्यामुळे ते मतदानाआधी न पोहोचल्यास अनेक पक्षांना फटका बसू शकतो, असे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.

# संतप्त बापानेच केली मद्यपी मुलाची हत्या

■ मुंबई

पोटच्या मुलाच्या नशेबाजीला कंटाळून वडिलांनीच त्याची हत्या केल्याची घटना अंधेरी येथे शुक्रवारी रात्री घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी हत्येचा गुन्हा नोंदविला असून, मारूती सूर्यवंशी (६५), नितीन मारुती सूर्यवंशी (४२) या दोघांना अटक केली आहे. नीलेश मारुती सूर्यवंशी (४५) असे हत्या झालेल्याचे नाव आहे.

अंधेरीच्या सुभाषनगर परिसरात सूर्यवंशी कुटुंबीय राहण्यास आहे. नीलेश याला नशापाणी करण्याची सवय होती. तो नशा करून आल्यानंतर घरी सतत वाद घालत होता. शुक्रवारी रात्रीही तो नेहमीप्रमाणे नशा करून आला होता. यावेळी कुटुंबात वाद झाला. याच रागात वडील मारुती आणि भाऊ नितीन याने लाकडी बॅट नीलेशच्या डोक्यावर मारून त्याला जखमी केले. यामध्ये नीलेशचा मृत्यू झाला. मुलाच्या आईकडे केलेल्या चौकशीत हा प्रकार उघडकीस आला.

# सात महिन्यांत हरवलेली 861 बालके पालकांच्या हवाली

■ मुंबई

मध्य रेल्वेच्या रेल्वे संरक्षण दलाच्या 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत एप्रिल ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत हरवलेल्या ८६१ बालकांना त्यांच्या पालकांच्या हवाली करण्यात रेल्वे संरक्षण दलाला यश आले आहे. रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) यांच्या मदतीने हा उपक्रम राबविण्यात आला असल्याची माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली. यामध्ये ५८९ मुले आणि २७२ मुलींचा समावेश आहे.

रेल्वे स्थानकामध्ये आढळलेली मुले काहीवेळेस कौटुंबिक भांडण किंवा चांगले जीवन जगण्याच्या उद्देशाने शहरांकडे आकर्षित होऊन घर सोडतात. कुटुंबीयांना न सांगता ती रेल्वेने मोठ्या शहरांकडे प्रवास करतात. परंतु त्यांना नेमके कुठे जावे हे माहिती नसल्याने ती रेल्वे स्थानकांमध्येच बसून राहतात. अशा मुलांना ओळखण्यासाठी रेल्वेच्या आरपीएफ जवानांना विशेष प्रशिक्षण दिले जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. रेल्वे स्थानकामध्ये आढळलेल्या अशा मुलांशी आरपीएफ कर्मचारी संपर्क साधतात, त्यांच्या समस्या समजून घेतात. या मुलांकडून त्यांच्या पालकांबाबत विचारपूस करून त्यांना त्यांच्या पालकांशी पुन्हा एकत्र येण्यासाठी सल्ला देतात. तसेच त्यांच्या पालकांसोबत भेट घडवून आणण्यासाठी मदत करत आसल्याचे त्यांनी सांगितले.

# गोखले पुलाच्या कामाला विलंब

■ मुंबई

अंधेरी पूर्व-पश्चिमेल जोडणाऱ्या गोपाळ कृष्ण गोखले पुलाच्या दक्षिण बाजूचा गर्डर रेल्वे भागावर स्थापित केल्यानंतर आता गर्डर रेल्वे रुळांपासून १४ मीटर उंचीपर्यंत आणणे यांसह अन्य तांत्रिक कामे १४ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण केली जाणार होती. यासाठी मुंबई महापालिकेकडून कंत्राटदारालाही मुदत देण्यात आली. मात्र रेल्वे हद्दीतील या कामाला विलंब होणार असून त्यामुळे पुढील कामही खोळंबणार आहेत. या विलंबामुळे मुंबई महापालिकेकडून कंत्राटदाराला दंड होण्याची शक्यता आहे. अंधेरी पूर्व आणि पश्चिम दिशेच्या वाहतुकीदरम्यान महत्त्वाचा दुवा असलेल्या गोखले पुलाच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले आहे. पुलाचा हा भाग २६ फेब्रुवारीपासून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. त्यावरून हलक्या वाहनांना जाण्याची परवानगी आहे. आता या पूल उभारणीतील महत्त्वाचा व दुसरा टप्पा म्हणजे दुसरा गर्डर स्थापन करण्याचे काम सुरू करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून ४ सप्टेंबर २०२४ ला गर्डर रेल्वे भागावर २५ मीटरपर्यंत सरकविण्याचे कामकाज यशस्वीपणे पूर्ण केले. महाकाय असा गर्डर एकूण ८६ मीटर सरकविणे आवश्यक असते. त्यामुळे उर्वरित कामही नुकतेच पूर्ण करण्यात आल्याची माहिती मुंबई महापालिकेतील सूत्रांनी दिली. आता दुसरा गर्डर हा रेल्वे रुळांपासून १४ मीटर उंचीपर्यंत आणणे यासह अन्य महत्वाची तांत्रिक कामे पार पाडावी लागणार आहेत. २६ फेब्रुवारी २०२४ ला गोखले पुलाचा एक टप्पा सुरू झाला आहे. पहिल्या टप्प्यातील स्थापित असलेल्या गर्डरच्या समान पातळीवरच दुसऱ्या टप्प्यातील गर्डर आणणे गरजेचे आहे. ही कामे करण्यासाठी भल्यामोठ्या क्रेनची आणि ती क्रेन ठेवण्यासाठी जागेची गरज मुंबई महापालिकेला आणि कंत्राटदाराला आहे. त्यासाठी अंधेरी पश्चिमेला असलेल्या टाटा कंपनीच्या जागेची चाचपणी केली. मात्र आता कंत्राटदाराकडून उपलब्ध होणारी क्रेन विलंबाने दाखल झाली आहे.

# दोघांनी हौसेसाठी चोरल्या

■ मुंबई

हौस म्हणून रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दुचाकींची चोरी करणाऱ्या एका अल्पवयीन मुलासह एका आरोपीला रफी अहमद किडवाई मार्ग पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी या कारवाईत एकूण पाच गुन्ह्यांची उकल करत चोरीच्या सहा दुचाकी जप्त केल्या आहेत. वडाळ्यातील एका इमारतीसमोर उभी केलेली दुचाकी १५ ऑक्टोबरच्या रात्री चोरीला गेली. याबाबत तक्रार येताच अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा नोंदवत रफी अहमद किडवाई मार्ग पोलिसांनी तपास सुरू केला. घटनास्थळावरील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असता दोन संशयित आरोपींनी ही दुचाकी चोरल्याचे दिसले. गुन्हे प्रकटीकरण पथकाने वडाळा, अँन्टॉप हिल, वडाळा टीटी, नेहरूनगर, चुनाभट्टी, आरसीएफ आणि चेंबूर पोलिस ठाण्यात जाऊन शासकीय आणि खासगी, अशा सुमारे २०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासात आरोपींचे फोटो मिळविले. त्यानंतर आरोपींपर्यंत माग काढण्यात त्यांना यश आले. माळजीने चौकशीत दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी रफी अहमद किडवाई मार्ग पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांसह भोईवाडा, वडाळा, आरसीएफ पोलिस ठाण्यात दाखल पाच गुन्ह्यांची उकल केली. माळजीकडून चोरीच्या एक लाख ६५ हजार रुपये किमतीच्या एकूण सहा दुचाकी हस्तगत करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

# काँग्रेसचे 28 बंडखोर उमेदवार 6 वर्षासाठी काँग्रेस पक्षातून निलंबित

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार तसेच काँग्रेसच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी केलेल्या विविध मतदारसंघातील एकूण २८ जणांना काँग्रेस पक्षातून ६ वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या आदेशावरून व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या निर्देशाने ही कारवाई करण्यात आली आहे. प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी ही माहिती दिली आहे.

# नाविका सागर परिक्रमा II करणारे आयएनएसव्ही तारिणी ऑस्ट्रेलियातील फ्रेमेंटल येथे दाखल

■ मुंबई



नाविका सागर परिक्रमा II नावाची जागतिक परिक्रमा मोहीम हाती घेणारे तारिणी हे भारतीय नौदलाचे जहाज, 39 दिवसांच्या आव्हानात्मक सागरी प्रवासानंतर, 9 नोव्हेंबर 24 रोजी भारतीय प्रमाण वेळेनुसार सुमारे 14: 30h वाजता (स्थानिक वेळेनुसार 17:00 वाजता) ऑस्ट्रेलियातील फ्रेमंटल या बंदरात दाखल झाले. परिक्रमेवर निघालेल्या या जहाजाचा हा पहिलाच थांबा होता.

या ऐतिहासिक मोहिमेला 2 ऑक्टोबर 24 रोजी गोव्यातून नौदल प्रमुख अॅडमिरल दिनेश के त्रिपाठी यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केले होते

या जहाजाने गोव्यातून निघाल्यापासून 4900 सागरी मैल अंतर कापले आहे. या जहाजाने 16 ऑक्टोबर 24 रोजी विषुववृत्त तर 27 ऑक्टोबर 24 रोजी मकर वृत्त ओलांडले आहे. या 38 दिवसांच्या अखंडित प्रवासादरम्यान, लेफ्टनंट कमांडर दिलना के आणि लेफ्टनंट कमांडर रूपा या भारतीय नौदलातील जोडीने वाऱ्याला तोंड देत, शांत ते प्रतिकूल अशा विविध हवामानाचा सामना केला, या प्रवासात त्यांना 40 नॉट्स वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याला तसेच 4 ते 6 मित्र उंचीच्या लाटांना तोंड द्यावे लागले. संपूर्ण प्रवासात, संपूर्ण कर्मचारी दलाचे आरोग्य उत्तम होते आणि आपल्या संकल्पाप्रती दृढ राहिले. खडतर परिस्थितीला तोंड देताना या दलाने असीम धैर्याचे प्रदर्शन केले.

नौदल प्रमुखांनी या मोहिमेच्या प्रगतीचे बारकाईने निरीक्षण केले असून त्यांना दररोज या मोहिमेची अद्यतनित माहिती दिली जात होती. दिवाळीच्या पूर्वसंध्येला, हे जहाज सागरी प्रवासात असताना, नौसेना प्रमुखांनी यावरील दलाशी संवाद साधला होता. त्यावेळीही हे संपूर्ण दल त्यांच्या ध्येयासाठी पूर्णपणे प्रेरित आणि समर्पित असल्याचे दिसून आले.

आयएनएसव्ही तारिणीचे फ्रेमंटल बंदरात आगमन झाल्यावर पर्थ येथील भारताचे वाणिज्य दूतावास अधिकारी,कॅनबेराचे संरक्षण सल्लागार, इंडियन नेव्ही सेलिंग असोसिएशन चे सचिव, रॉयल ऑस्ट्रेलियन नेव्हीचे प्रतिनिधी यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते या नौकेचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी तसेच ऑस्ट्रेलियात राहणारे भारतीय नौदलाचे निवृत्त कर्मचारी देखील उपस्थित होते. तामिळ असोसिएशन ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाने पराई ड्रम आणि कोंबू थाराई ही तालवाद्ये वापरून सादर केलेल्या शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमाने या स्वागत समारंभाला आणखी रंगत आणली तसेच स्वागत समारंभाला एक समृद्ध सांस्कृतिक स्पर्शही लाभला.

ही मोहीम आंतरराष्ट्रीय सागरी समुदायांसोबत मजबूत संबंध वाढवण्याच्या भारताच्या वचनबद्धतेला देखील अधोरेखित करते आणि भारताच्या समृद्ध सागरी वारशाचे राजदूत म्हणूनही काम करते.

# राज्यात लेप्टोच्या रुग्णांत घट

■ मुंबई

पावसाळ्यात साथीचे आजार डोके वर काढतात. यंदा मात्र लेप्टोचे रुग्णांची संख्या घटली असून गेल्या दहा महिन्यांत ८८० रुग्ण आढळले आहेत. तर एकाचा मृत्यू झाला आहे.

पावसाळा सुरू होताच आरोग्य यंत्रणादेखील साथीच्या आजारांचा सामना करण्यासाठी सज्ज असते. परंतु असे असले, तरीदेखील जून आणि जुलै महिन्यात लेपटोच्या रुग्णांची संख्या वाढत असते. यंदा राज्यात पाऊस जास्त होऊनही आरोग्य विभागाला गेल्यावर्षीच्या तुलनेत लेप्टोच्या रूग्णसंख्येवर प्रतिबंध घालता आला आहे. गेल्यावर्षी १४८४ रूग्णसंख्या होती आणि आठ जणांचा लेप्टोने बळी घेतले होते. त्या तुलनेत यंदा ८८० रूग्ण आढळून आल्याने रुग्णसंख्या घटली आहे. केवळ एकाच मृत्यू झाल्याने मृत्यूचे प्रमाणही कमी झाले. लेप्टो प्रभावी जिल्ह्यात उपचारासाठी औषधे पुरेसा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आली आहेत. लेप्टोचे निदान करण्यासाठी रॅपिड डायग्नोस्टिक कीटचीही सुविधा करण्यात आली असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, गेल्या चार वर्षांत लेप्टोच्या रुग्णसंख्येत वाढ झाली होती. त्याचबरोबर मृत्यूसंख्या वाढल्याने प्रशासनाची डोकेदुखी वाढली होती. यंदा मात्र रुग्णसंख्या नियंत्रणात असल्याने आरोग्य यंत्रणेला दिलासा मिळाला आहे.

# केंद्रीय संचार ब्युरोतर्फे कोल्हापूरमध्ये मतदार जागृती अभियान

मुंबई

निवडणूक आयोग आणि भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्युरो कार्यालयातर्फे 11 नोव्हेंबर पासून कोल्हापूर मध्ये मतदार जागृती अभियान सुरू होत आहे.

अभियानाची सुरुवात जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर इथून सकाळी 10:30 वाजता होईल. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते आणि कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस यांच्या उपस्थितीत प्रसिद्धी अभियानाच्या व्हॅनला हिरवा झेंडा दाखवण्यात येईल.

20 नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात मतदान होणार आहे.राज्यातील प्रत्येक मतदार नागरिकांनी न चुकता मतदान करावे, यासाठी हे अभियान हाती घेण्यात आले आहे. राज्यातील 15 जिल्ह्यांमध्ये प्रचार वाहनाद्वारे मतदारांना अवश्य मतदान करण्याविषयी प्रोत्साहित करण्यासाठी हे अभियान राबवण्यात येईल; तसेच मतदान प्रक्रिया, मतदान केंद्राची माहिती कुठून मिळवायची, आचारसंहिता नियम, आचारसंहितेचे उल्लंघन होताना दिसल्यास कुठे तक्रार करायची, अशी सर्व माहिती दृकश्राव्य माध्यमातून देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्रातील कलावंत, खेळाडू यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे मतदारांना केलेले आवाहन एलइडी स्क्रिनच्या माध्यमातून प्रदर्शित करण्यात येणार आहे. जिल्ह्यात राज्य सरासरीपेक्षा मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या भागामधून हे प्रचार वाहन प्रवास करेल. केंद्रीय संचार ब्युरोचे लोककलावंत देखील लोककलेच्या माध्यमातून मतदारांना जागरूक करण्याचा प्रयत्न करतील. हा उपक्रम दिनांक 11 ते 20 नोव्हेंबर दरम्यान सुरू राहील. या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आणि जिल्हा प्रशासनाचे सहकार्य मिळत आहे.

# पुरुषोत्तम बेर्डे यांना मृद्गंध जीवनगौरव

■ मुंबई

लोककलेसाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या संगीत नाटक अकादमी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त महाराष्ट्र शिरोमणी लोकशाहीर विठ्ठल उमप यांनी आपल्या आवाजाने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशाविदेशात आपली मोहिनी पसरवली होती. लोककलेचा हा वारसा जपत ही परंपरा त्यांची मुले अभिमानाने पुढे चालवतायेत. आपल्या वडिलांच्या स्मृतींना उजळा देत त्यांच्या १४व्या स्मृती दिनानिमित्त याहीवर्षी लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत समारोह व विठ्ठल उमप फाऊंडेशनचा 'मृद्गंध पुरस्कार' वितरणाचा सोहळा येत्या २६ नोव्हेंबरला ठाणे येथील काशिनाथ घाणेकर सभागृहात सायंकाळी ६ वाजता होणार आहे.

शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना सन्मानपूर्वक विठ्ठल उमप फाऊंडेशनचा 'मृद्गंध पुरस्कार' २०२४ प्रदान करण्यात येणार आहे. यंदाच्या या पुरस्काराचे मानकरी पुरुषोत्तम बेर्डे (जीवनगौरव), ज्ञानेश महाराव (लेखक व पत्रकार), सुरेखा पुणेकर (लोककला क्षेत्र), श्रीगौरी सुरेश सावंत (सामाजिक क्षेत्र), आदेश बांदेकर (आभिनय व सूत्रसंचालक), सुचित्रा बांदेकर (अभिनेत्री आणि निर्माती), रोहित राऊत (नवोन्मेष प्रतिभा संगीत क्षेत्र), दीपाली देशपांडे (क्रीडा क्षेत्र) ही मान्यवर मंडळी आहेत. विशेष म्हणजे विठ्ठल उमप फाऊंडेशनतर्फे काही बॅकस्टेजच्या कलाकारांना आर्थिक सहकार्याचा हात देण्याचा प्रयत्न विठ्ठल उमप यांचे चिरंजीव नंदेश उमप करणार आहेत. बाबांकडून लाभलेला कलेचा वारसा पुढे घेऊन जात असतानाच आनंदाच्या नवनव्या वाटा गवसल्या, असे प्रतिपादन नंदेश उमप यांनी केले.

'कला आपल्यासोबत एक संवेदना, उत्साह आणि ऊर्जा आणते. पिढ्यानपिढ्या जपलेला कलेचा वारसा आपल्या जीवनाचा व संस्कृतीचा अर्थ आहे. विविध क्षेत्रात आपलं बहुमूल्य योगदान देणाऱ्या वेगवेगळ्या मान्यवरांचा सत्कार करणे आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे', असे गायक नंदेश उमप यांनी यावेळी सांगितले.

## संपादकीय

### बॉस आणि दास

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास हे वाढत्या महागाईने चिंताग्रस्त झालेले आहेत. रिझर्व बँकेचे गव्हर्नरच चिंताग्रस्त असतील. तर भारतातील सर्वात दुःखी मध्यमवर्गाने कुणाकडे पाहायचे? हा मोठा प्रश्न आहे. आपल्या देशातील श्रीमंत लोकांना महागाई कितीही वाढली. तरी ते त्यांना अजिबात माहीत नसते. त्यांना त्याची गरजही नसते. गरीब आणि तथाकथित गरीब यांच्यासाठी सरकारच्या तिजोरीतून एकापेक्षा एक रेवड्यांचे डबे बाहेर निघत असतात. तेव्हा बिचाऱ्या गरिबांनाही सुखाचे दिवस आले आहेत. असे आपण म्हटले पाहिजे. किंबहुना भारतात कोणे एकेकाळी गरीब मजूर होते. मग त्यांच्या पगार वाढीसाठी मुंबईसारख्या शहरात कॉम्रेड डांगे, जॉर्ज फर्नांडिस यांच्यासारखी बडी बडी कामगार नेते मंडळी सरकार व भांडवलदारांशी जोरदार भांडत असत. त्यांची आंदोलने होत असत. दिवाळीच्या सुमारास मोठमोठ्या सभा गाजत असत. अनेक पुढाऱ्यांची तोंडे वाजत असत आणि मग सरकार किंवा भांडवलदार तत्कालीन मजुरांना गोड गोड दूध पाजत असत. पण आता भारतातून गरीब जवळपास समाप्त झालेले असले, तरी अजूनही गरिबी संपलेली नाही. हे अत्यंत गोड सत्य आहे. गरिबांना दरमहा जेवणासाठी जे धान्य लागते. ते 80 कोटी गरीब लोकांपर्यंत सरकार द्वारा पोहोचवले जाते. मध्यमवर्गीयांना मात्र तोंड दाबून बुक्क्यांचा मार मिळत असतो. त्यांची नोकरी गेली तर त्यांना वाली कुणीच नसतो. हे आपण नेहमीच पाहतो. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांना महागाईची चिंता सतावत असली. तरी भारताच्या आर्थिक वृद्धीबाबत जे काही आकडे मिळतात. ते अगदीच निराशाजनक नाहीत, असे त्यांचे म्हणजेच शक्तिकांत दास यांचे म्हणणे आहे. रिझर्व्ह बँक महागाईला कमी करण्यासाठी वेगवान पावले उचलणार आहे, असेही त्यांचे म्हणणे आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीतही भारतीय अर्थव्यवस्था अंगदाच्या पायासारखी मजबूत आहे. असे दस्तुरखुद्द रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर दास म्हणतात. दास कोणाचेही दास नसल्यामुळे ते सत्य बोलू शकतात. वित्तीय स्थिरता किंवा आर्थिक स्थैर्य कायम ठेवण्यासाठी हे दास साहेब काहीतरी मोठी पावले उचलू शकतात, असेही त्यांचे म्हणणे आहे. त्यातच आशावाद म्हणजे 2024-25 सालासाठी जीडीपीच्या दरात 7.2% वाढ होईल, या अनुमानावर मात्र ते कायम आहेत. काही विद्वान लोकांचे म्हणणे असे आहे की, आपला वृद्धीचा दर 7% पेक्षा कमी राहू शकतो. त्यावर रिझर्व्ह बँक असे म्हणते की, आम्ही 70 पेक्षा अधिक बाबींवर नजर ठेवून असतो. त्यामध्ये रोजच्या वापरातील वस्तू नक्कीच आहेत. काही वस्तू महाग झालेल्या आहेत. मागील महिन्यात संपलेल्या सबसिडीच्या खर्चात थोडी वाढ झालेली आहे. त्यामुळे काहीतरी कारवाई करू. एकूणच रिझर्व बँकेचे गव्हर्नर म्हणतात की, आपण निश्चितपणे महागाई कमी करू शकतो. दास साहेब आपल्या शब्दाला सत्याचे स्वरूप येवो, अशी आमची मनापासून कामना आहे.

अब बहुत हो गई, महंगाई 'बॉस'
सस्ताई लाएंगे, आरबीआय के 'दास'

## भारतीय लोकशाहीचा विजय असो

स्वातंत्र्य मिळाल्यापासून लोकशाहीसाठी मतदान होत असते. 1952 ते 1962 पर्यंत देशात काँग्रेस हाच एकमात्र पक्ष होता. त्यावेळी मतदारांना कार्ड स्वरूपात मतपत्र दिले जात होते आणि मतदान कक्षात जाऊन त्याला पसंतीच्या उमेदवाराच्या पेटीत आपले मत टाकावे लागत होते. मात्र त्यावेळीही थोड्याफार प्रमाणात ही मतपत्रे विकत घेतली जात होती. त्यामुळे त्याच्या मध्येही गैरव्यवहार होत होता. हे दिसून आल्यामुळे त्यानंतर उमेदवारांसाठी मतपत्रिका छापून घेण्यात येऊ लागल्या आणि संपूर्ण उमेदवारांची यादी असलेल्या मतपत्रिकेवर शिक्का मारावा लागत होता. या पद्धतीने मतदाराला आपली मतपत्रिका तेथे असलेल्या कर्मचाऱ्यांच्या समोरच पेटीत टाकावी लागत असे. हा प्रकार वर्षानुवर्ष चालला. त्यानंतर नवीन शतकात इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन अर्थात ईव्हीएम आले. ओरिजिनल मतदार कार्डांच्या नंतर झालेला हा तिसरा बदल आहे. म्हणजेच आता ना मतदार कार्ड ना मतपत्रिका, आता बटन दाबले की काम झाले. अशाप्रकारे लोकशाहीच्या मतदानाची चढती भाजणी आकाराला आलेली आहे. पूर्वीच्या काळी स्वयंचलित गाड्यांना हँडल मारून सुरू करावे लागत असे. तेव्हा मोटरसायकल असो किंवा स्कूटर असो. चालू करण्यासाठी कीक मारावी लागत असे. आता मात्र तसे नाही. चार चाकी असो, किंवा स्कूटर असो, किंवा मोटरसायकल असो. फक्त स्विच दाबला की गाडी सुरू होते. तशीच आपल्या मतदानाची गाडीही बोटावर शाई लावणे आणि बटन दाबण्यापूरती उरलेली आहे, असो. हा झाला मतदारांचा कार्यक्रम, पण बिचाऱ्या उमेदवारांना किती किती गोष्टींसाठी काय काय करावे लागते. याचा विचार केला तर सध्याच्या निवडणुकीसाठी उभे राहणे आणि नियम पालन करणे मोठेच कठीण आणि जिकीरीचे झालेले आहे. आचारसंहिता पूर्वी होती. पण 90 च्या दशकात टी. एन. शेषन नामक निवडणूक आयुक्त आले आणि त्यांनी त्या आदर्श आचारसंहितेचा आदर्श म्हणजे काय? याचा वस्तूपाठ सांगून अयोग्य ठिकाणी कारवाई करून योग्य आचारसंहिता काय असते. ते दाखवून दिले होते. शोले चित्रपटात जसा गब्बरचा धसका होता. त्या चित्रपटात माता आपल्या मुलाला, बाळा रडू नको नाहीतर गब्बर येईल. असा धाक दाखवित त्यामुळे मूल रडायचे थांबत असे. असा त्या चित्रपटातील गब्बरचा जबरदस्त धाक होता. तसेच निवडणुकीमध्ये उभे असलेल्या उमेदवारांना 'आचारसंहिता पाळा नाहीतर, जाळून टाकतील शेषनच्या ज्वाळा' असा जबरदस्त धाक होता. खर्चावर मर्यादा असली पाहिजे. विनाकारण मोठमोठ्या सभा उमेदवारांनी घेऊ नये. खाण्यापिण्यावर ठराविकच खर्च व्हावा. असे कित्येक नियम आले. आता उमेदवारांना आपल्या संपत्तीची घोषणा करावी लागते. आपल्यावर कोणते आरोप, तेही कोणत्या गुन्ह्याखाली आहेत. याची जाहिरात वर्तमान पत्रात प्रकाशित करावी लागते. त्यामुळे आपले लोकप्रतिनिधी कसे आहेत, हे लोकांना समजावे अशी ही व्यवस्था आहे. आता या निवडणुकीतील खर्चाबाबत जी तरतूद आहे. त्यात तरतुदीतील फोलपणा दिसतो, पण सिद्ध करता येत नाही. पूर्वीच्या काळी पक्षाचे कार्यकर्ते स्वतःच्या खिशातून आपल्या प्रचारासाठी आलेल्या लोकांचे खाणेपिणे करून आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी जीवाचे रान करीत असत. आम्ही असे अनेक उमेदवार पाहिलेले आहेत की, ज्यांचा खर्च अगदी काही हजारांच्या घरातच असायचा. दोन-चार उदाहरणे समोरच आहेत. जळगाव जामोद मतदारसंघात शेकापचे के आर पाटील नावाचे उमेदवार तेव्हाच्या उमेदवारी डिपॉझिटचे शंभर ते दोनशे रुपये तेवढेच भरत असत. त्यानंतर जनतेच्या सहभागातून त्यांचा प्रचार चालत असे. दोन ते चार हजार रुपयांचा खर्चही जनता करीत असे आणि विशेष म्हणजे ते निवडून येत असत. आम्ही हे उदाहरण मुद्दाम दिलेले आहे. असे अनेक पुढारी संपूर्ण महाराष्ट्रभरात रात्रंदिवस पाचही वर्ष जनतेच्या समस्यांसाठी उभे राहत असत. तेव्हा आदर्श आचारसंहिता नसली. तरी पुढाऱ्यांचे वागणेच इतके आदर्श असे की, त्या काळात एखाद्या उमेदवारावर छोटासा कलंक असला. तरी त्याला लाज वाटत असे. आता आमच्या अनेक पुढाऱ्यांना स्वतःवरचा कलंक म्हणजे कलंकशोभा वाटते. यामुळेच बलात्कारापासून खुनाच्या आरोपापर्यंत घोषित असलेले सर्वच उमेदवार उजळ माथ्याने निवडून येत असतात. आज उमेदवारांना केवळ कार्यकर्त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करावी लागत नाही. तर इतरही अनेक छुपे खर्च गुपचूप चोरीछुपे करावे लागतात. पुणे, मुंबईसारख्या महानगरात तर या प्रकारच्या खर्चांना काही सीमाच नसते. निवडणूक आयोगाचे निरीक्षक आणि शेषन साहेबांच्या जागी असलेले पुळचट आयुक्त यांच्यासोबत सर्वांना सर्व काही ठाऊक असते. मात्र सर्वच जाणूनबुजून गप्प बसतात. आता निवडणूक हा मोठा व्यवसाय झालेला आहे. निवडणूक लढवीत असलेल्या उमेदवारांवर खर्चासाठी अनेक प्रकाराने मदत करणारे मोठे उद्योजक आहेत. भविष्यात आपले काम करून घेण्यासाठी उपयुक्त असतील अशा उमेदवारांना किती आकड्यांची मदत दिली जाते. याचे खरे आकडे समोर आले. तर भल्याभल्यांना आकडी येईल आणि तुमच्या आमच्यासारख्यांचे डोळे पांढरे होतील. एकदा निवडून आल्यावर पुढच्या पाच वर्षात लोकसभेसाठी होणारा खर्च वसूल करायचा असतो. आपण निवडणुकीसाठी केलेला खर्चही वसूल करायचा असतो. विधानसभा मतदारसंघात फिरण्यासाठी महागड्या वाहनाची इंधनासह सोय करावी लागते. तेव्हा मतदार संघासाठी सरकारकडून येणारा निधी आणि लाखो रुपयांच्या पगाराची तरतूद यामुळे आपल्या लोकप्रतिनिधींकडे अपेक्षेने पाहणाऱ्या जनता जनार्दनाचा अनेकदा अपेक्षाभंग होतो. अशी ही आपली निवडणूक सध्या महाराष्ट्रात साग्रसंगीत सुरू आहे. मोठमोठ्या लोकांच्या शब्दप्रदूषणामुळे अनेकांना गुदमरल्यासारखे वाटते. पण त्यांना लाज नाही आणि आपल्याला काहीच इलाज नाही. हेच खरे आहे. तेव्हा अशा निवडणुकीचा डोके न वापरता शांतपणे बघत बघत आनंद घ्यावा. हीच अपेक्षा आहे. एकूणच, भारतीय लोकशाहीचा विजय असो!

# भारतीय शहरांमध्ये एकात्मिक आणि शाश्वत मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट सिस्टमची गरज

ऐतिहासिकदृष्ट्या, भारतातील शहरी वाहतुकीचे नियोजन मागणी आणि पुरवठा संतुलित करण्यावर केंद्रित आहे, बऱ्याचदा शाश्वततेच्या महत्त्वपूर्ण परिमाणाकडे दुर्लक्ष केले जाते. धोरणे प्रामुख्याने "लोकांऐवजी फिरती वाहने" कडे केंद्रित होती, परिणामी सार्वजनिक वाहतूक (पीटी) प्रणालीवर लक्ष केंद्रित केले गेले नाही, ज्यामुळे गर्दी, पार्किंगची कमतरता आणि अपघात यासारख्या वाहतुकीशी संबंधित बाह्यगोष्टी कमी होऊ शकल्या असत्या. भारतीय शहरांमधील सार्वजनिक वाहतुकीत प्रामुख्याने बस-आधारित प्रणालींचा समावेश आहे, ज्यात सिटी बस आणि बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टम (बीआरटीएस) तसेच मेट्रो रेल्वे, उपनगरीय रेल्वे, ट्राम नेटवर्क आणि पॅराट्रान्झिट किंवा इंटरमीडिएट पब्लिक ट्रान्सपोर्ट (आयपीटी) प्रणालीअंतर्गत सामायिक गतिशीलता सेवा यासारख्या रेल्वे-आधारित पद्धतींचा समावेश आहे. सार्वजनिक बाईक शेअरिंग योजना आणि ओला आणि उबरसारख्या राइड-हेलिंग सेवा यासारखे उपक्रम बऱ्याचदा सार्वजनिक वाहतुकीच्या या पारंपारिक मार्गांना पूरक असतात.

मात्र, २००६ मध्ये राष्ट्रीय नागरी वाहतूक धोरण (एनयूटीपी) लागू झाल्यानंतर वाहनांऐवजी चालणाऱ्या लोकांकडे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. अलीकडच्या वर्षांत, भारत सरकारने स्मार्ट सिटी मिशन, अटल मिशन फॉर रिज्युव्हनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) आणि ग्रीन अर्बन ट्रान्सपोर्ट स्कीम (जीयूटीएस) यासह अनेक उपक्रम सुरू केले आहेत.

अलीकडच्या वर्षांत, भारत सरकारने स्मार्ट सिटी मिशन, अटल मिशन फॉर रिज्युव्हनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) आणि ग्रीन अर्बन ट्रान्सपोर्ट स्कीम (जीयूटीएस) यासह अनेक उपक्रम सुरू केले आहेत.

या प्रयत्नांनंतरही टियर १ आणि २ शहरांमध्ये त्यांच्या प्रवासाच्या गरजा ३३ टक्के पीटीद्वारे पूर्ण केल्या जातात, तर टियर ३ शहरांमध्ये त्याचा वाटा केवळ ४ टक्के आहे. सुरतमध्ये ३ टक्क्यांपासून ते बेंगळुरूमध्ये ४३ टक्क्यांपर्यंत बसच्या शेअरमध्ये लक्षणीय फरक आहे. नागरी वाहतूक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, 1 दशलक्ष लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये सार्वजनिक वाहतूक पद्धतीचा वाटा 40-45 टक्के असावा आणि 5 दशलक्ष लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये पीटीद्वारे सेवा दिलेल्या गतिशीलतेच्या मागणीच्या 75 टक्के असावा.

एकात्मिक मल्टिमोडल वाहतूक व्यवस्थेची गरज

चालणे, सायकल चालविणे आणि पीटी मधील गुंतवणुकीपेक्षा महामार्ग आणि पार्किंगला प्राधान्य दिल्याने प्रामुख्याने भारतीय शहरांमधील वाहतूक व्यवस्थेच्या अकार्यक्षमतेस हातभार लागला आहे. शिवाय, भारतातील पीटीचा विकास असमन्वयित आहे, शहराचा आकार आणि लोकसंख्येच्या गरजा यापेक्षा स्वतंत्रपणे प्रणाली विकसित होत आहेत. एनयूटीपी २००६ नंतर प्रस्तावित पीटी प्रणालींना परस्परविरोधी उद्दिष्टांचा सामना करावा लागला आहे, ज्यामुळे खंडित परिणाम झाले आहेत.

सर्वसमावेशक आणि एकात्मिक वाहतूक नियोजनाच्या अभावामुळे महानगरांमधील पीटी



मोड पूरक पद्धतीने कार्य करण्याऐवजी एकमेकांशी स्पर्धा करण्यास भाग पाडले आहे. परिणामी, बऱ्याच शहरांमध्ये मल्टिमोडल वाहतूक व्यवस्था असली तरी त्या मोठ्या प्रमाणात "अविभाजित" आणि "अस्थिर" आहेत. नवीन औपचारिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ऑपरेशनल, संस्थात्मक आणि माहितीत्मक पातळीवर पूर्वीच्या पद्धतींशी समाकलित करण्यात अपयशी ठरतात. शिवाय, वाहतुकीच्या विविध साधनांमधील भौतिक आणि भाडे एकत्रीकरण बहुतेक भारतीय शहरांमध्ये अनुपस्थित आहे.

### इंटिग्रेटेड मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट सिस्टीमची व्याख्या

एकात्मिक आणि शाश्वत मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट सिस्टम (आयएसएमटीएस) खालील गोष्टी सुनिश्चित करते:

सुरक्षितता, कमी रस्ते अपघात आणि महिला, मुले आणि वृद्ध लोकांची शारीरिक सुरक्षितता.

सुलभता, भौतिक किंवा प्रणालीगत अडथळ्यांना सामोरे न जाता वाहतुकीच्या विविध साधनांमध्ये जलद आणि सुलभ हालचालीसह आणि कमी हस्तांतरणासह, वाहतुकीवर कमी मासिक खर्च सुनिश्चित करणे.

छायांकन, प्रकाश योजना आणि फूटपाथ किंवा बस स्टॉपवर बसून गंभीर हवामानाविरूद्ध लवचिकता प्रदान करणे आणि गर्दी कमी करण्यासाठी इष्टतम कार्य सुनिश्चित करणे.

सुविधा वापरकर्त्यांना त्यांच्या गंतव्यस्थानी कसे पोहोचायचे आणि विविध मार्गांवर त्वरीत प्रवेश कसा करावा याचे नियोजन करू शकतात.

कार्बन उत्सर्जन आणि वायू प्रदूषणाच्या बाबतीत प्रणालीवरील एका प्रवासाचा खर्च खाजगी वाहनात घेतलेल्या त्याच सहलीपेक्षा कमी आहे याची शाश्वतता सुनिश्चित करते.

आयएसएमटीएस खाजगी मोटार वाहनांकडे झुकत नसलेल्या रस्त्यांच्या जागेचे न्याय्य वितरण देखील करते. भारतीय महानगरांमध्ये अशा आयएसएमटीएसची हमी देण्यासाठी, मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट सिस्टमच्या घटकांमधील परस्परसंवाद समजून घेणे आणि शहराला शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांकडे नेणारी एक सामान्य संकल्पनात्मक चौकट तयार करणे आवश्यक आहे.

अजैविक घटकांमध्ये पदपथ, दुचाकी लेन, संक्रमण मार्ग, इंटरचेंज, ट्रान्सफर स्टेशन, पार्क-अँड-राइड सुविधा आणि ड्रॉप-ऑफ पॉइंटसह वाहतुकीच्या पायाभूत सुविधांचा समावेश आहे.

इंटिग्रेटेड मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट सिस्टीमचे घटक

मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट सिस्टीमच्या इकोसिस्टममध्ये बायोटिक आणि अजैविक घटकांचा समावेश असतो. अजैविक घटकांमध्ये पदपथ, दुचाकी लेन, संक्रमण मार्ग, इंटरचेंज, ट्रान्सफर स्टेशन, पार्क-अँड-राइड सुविधा आणि ड्रॉप-ऑफ पॉइंटसह वाहतुकीच्या पायाभूत सुविधांचा समावेश आहे. दुसरीकडे, जैविक घटकांमध्ये वाहतूक भागधारक, म्हणजेच ट्रान्झिट ऑपरेटर आणि वापरकर्ते असतात. शहरी ट्रान्झिट ऑपरेशन्समध्ये गुंतलेल्या प्रमुख एजन्सींमध्ये स्थानिक सरकारे, सार्वजनिक आणि खाजगी वाहतूक सेवा प्रदाते, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणे आणि उपक्रम, पार्क-अँड-राइड ऑपरेटर, कार-शेअरिंग ऑर्गनायझेशन आणि आयपीटी ऑपरेटर्स यांचा समावेश आहे. वापरकर्त्यांच्या बाजूने, शहरातील वाहतूक सहभागींमध्ये पादचारी, सायकलस्वार, खाजगी वाहन चालक, कॅप्टिव्ह ट्रान्झिट रायडर्स, पॅराट्रान्झिट वापरकर्ते आणि कार-शेअरिंग प्रवासी यांचा समावेश आहे. आकृती 1 बहुआयामी वाहतूक प्रणाली परिसंस्थेचे योजनाबद्ध प्रतिनिधित्व प्रदान केले आहेत.

एकात्मिक वाहतुकीच्या पायाभूत सुविधांद्वारे भागधारकांमधील प्रभावी समन्वयाद्वारे बहुआयामी वाहतूक व्यवस्थेची शाश्वतता निश्चित केली जाते.

पुढे जाण्याचा मार्ग

एकात्मिक मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट सिस्टीम तयार करणे ही एक गुंतागुंतीची आणि बहुआयामी प्रक्रिया आहे. ज्यात विविध हितसंबंध असलेल्या विविध भागधारकांचा समावेश आहे. सध्या, भारतीय शहरांमध्ये पीटी प्रणाली सायलोमध्ये कार्यरत आहेत, ज्यात साधनांमध्ये कमीतकमी किंवा कोणतेही एकीकरण नाही, ज्यामुळे प्रवाशांसाठी महत्त्वपूर्ण आव्हाने निर्माण झाली आहेत, ज्यात शेवटच्या मैलापर्यंतची अपुरी कनेक्टिव्हिटी, पादचारी पायाभूत सुविधांचा अभाव, जसे की फूटपाथ आणि सायकलिंग लेन, प्रवासाचा लांबलेला वेळ आणि वाहतुकीच्या साधनांमध्ये हस्तांतरण करताना अस्वस्थता किंवा गैरसोय यांचा समावेश आहे.

भारतात झपाट्याने शहरीकरण होत असताना, भारतीय शहरांमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे संस्थात्मक एकात्मीकरण महत्त्वाचे बनले आहे. हे साध्य करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे युनिफाइड मेट्रोपॉलिटन ट्रान्सपोर्ट ऑथॉरिटी (यूएमटीए) ची स्थापना, ज्यास कायदेशीर जनादेशाद्वारे समर्थन दिले पाहिजे. शहरी गतिशीलतेसाठी सुसंगत आणि एकात्मिक दृष्टीकोन सुनिश्चित करून शहरांतर्गत वाहतुकीच्या सर्व साधनांशी संबंधित निर्णय घेण्याचे अधिकार यूएमटीएला दिले पाहिजेत.

भारताचे झपाट्याने शहरीकरण होत असताना, भारतीय शहरांमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे संस्थात्मक एकात्मीकरण महत्त्वाचे बनले आहे.

शिवाय, शहराचा मास्टर प्लॅन, कॉम्प्रिहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन (सीएमपी) आणि विशिष्ट वाहतूक प्रकल्पांसाठी विकास आराखडा (डीपी) यासारख्या नागरी नियोजनाच्या कागदपत्रांना आयएसएमटीएसच्या निर्मितीस समर्थन देण्यासाठी सरेखित करणे आवश्यक आहे. या योजनांनी मागील प्रयत्नांचा विचार केला पाहिजे आणि नवीन वाहतूक पायाभूत सुविधा विद्यमान प्रणालींना पूरक आहेत याची खात्री केली पाहिजे. पीटीच्या नवीन पद्धतींचे नियोजन करताना, विविध वाहतूक पद्धतींचे भौतिक एकीकरण सुनिश्चित करण्यासाठी मल्टिमोडल हब, सह-स्थित स्थानके आणि सामायिक पायाभूत सुविधा यासारख्या महत्त्वपूर्ण घटकांच्या डिझाइन आणि अंमलबजावणीकडे लक्ष दिले पाहिजे. याव्यतिरिक्त, सार्वजनिक वाहतुकीच्या सर्व मार्गांवरील वेळापत्रक आणि वेळापत्रकांचा समन्वय साधणे आवश्यक आहे. एकात्मिक वेळापत्रक प्रणाली लागू केल्यास प्रतीक्षा वेळ कमी होईल आणि वाहतूक नेटवर्कची एकंदर कार्यक्षमता सुधारेल.

शिवाय, शहरांनी मल्टिमोडल मोबाइल ॲप्लिकेशन्स, पब्लिक इन्फॉर्मेशन डिस्प्ले, प्रमाणित साइनेज आणि रिअल-टाइम अपडेट्स यासारखे एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्म प्रदान करून माहिती एकीकरण साध्य करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. या उपाययोजनांमुळे प्रवाशांना माहितीपूर्ण निर्णय घेता येतील आणि वाहतुकीच्या विविध साधनांमध्ये विनाअडथळा हस्तांतरण सुलभ होईल.

खंडित वाहतूक व्यवस्थेशी संबंधित आव्हानांवर मात करण्यासाठी आणि भारतीय शहरांमध्ये खऱ्या अर्थाने एकात्मिक, वापरकर्ता-केंद्रित आणि शाश्वत बहुआयामी वाहतूक व्यवस्था तयार करण्यासाठी समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे.

# MQ-9B ड्रोन करारः भारत-अमेरिका संबंधांमध्ये नव्या ताकदीचे संकेत

भारताने 31 MQ-9B प्रिडेटर ड्रोन खरेदी करण्यासाठी अमेरिकेशी करार केला आहे. हा करार 4 अब्ज डॉलर्सचा आहे. या अंतर्गत, अमेरिकन कंपनी जनरल ॲटॉमिक्सने बनवलेले ड्रोन आणि दूरस्थपणे चालणारे ड्रोन भारताला पुरवले जातील. या प्रिडेटर ड्रोनच्या खरेदीसाठी दोन्ही देशांमध्ये सरकार-ते-सरकार करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. 2023 मध्ये दोन्ही देशांमध्ये या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या होत्या आणि अलीकडेच सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीने त्याला मंजुरी दिली होती. मूल्याच्या दृष्टीने भारत आणि अमेरिका यांच्यातील हा आतापर्यंतचा सर्वात मोठा संरक्षण करार आहे. या करारामध्ये भारतात या ड्रोनसाठी देखभाल, दुरुस्ती आणि दुरुस्ती (MRO) सुविधा उभारणे समाविष्ट आहे. याव्यतिरिक्त, अमेरिकेतील ड्रोन उत्पादक जनरल ॲटॉमिक्स भारतात ड्रोन उपकरणे आणि घटक तयार करण्यासाठी तसेच भारताला जागतिक ड्रोन उत्पादन केंद्र म्हणून विकसित करण्यात मदत करण्यासाठी भारत फोर्ज या भारतीय कंपनीशी भागीदारी करेल. याव्यतिरिक्त, अमेरिका आणि भारतीय कंपन्यांमधील भागीदारीमुळे भारतात पुढच्या पिढीतील लढाऊ ड्रोनच्या निर्मितीसाठी अमेरिकेच्या बाजूने सल्लामसलत करण्याचा मार्गही मोकळा होईल. अर्थात, लढाऊ ड्रोनचे उत्पादन हे भारत-अमेरिका संयुक्त संरक्षण तंत्रज्ञानाच्या वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की युरोप आणि मध्यपूर्वेत सुरू असलेल्या युद्धांमध्ये लढाऊ ड्रोनचा मोठ्या प्रमाणात वापर केला गेला आहे आणि आता त्यांची मागणी वाढत आहे.

2023 मध्ये दोन्ही देशांमध्ये या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या होत्या आणि अलीकडेच सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीने त्याला मंजुरी दिली होती.

अमेरिकेकडून खरेदी केले जाणारे 31 प्रिडेटर ड्रोन भारताच्या तिन्ही दलांना दिले जातील. या 31 ड्रोनपैकी जास्तीत जास्त 15 ड्रोन भारतीय नौदलाला दिले जाण्याची शक्यता आहे, तर उर्वरित 16 ड्रोनपैकी 8-8 ड्रोन लष्कर आणि हवाई दलाला दिले जातील. भारतीय नौदल आधीच दोन MQ-9B प्रिडेटर ड्रोन वापरत आहे, ज्यापैकी एक सप्टेंबर महिन्यात बंगालच्या उपसागरात कोसळले. हे ड्रोन भारतीय नौदलासाठी खूप प्रभावी ठरले आहेत कारण नौदलाचे पाळत ठेवण्याचे क्षेत्र खूप मोठे आहे आणि हिंद महासागरात दूरदूरपर्यंत पसरलेले आहे. हे ड्रोन नौदलाला सागरी क्षेत्रातील प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवण्यास मदत करतात. जेव्हापासून हे ड्रोन नौदलाने भाडेतत्त्वावर घेतले आहेत, तेव्हापासून नौदल तसेच लष्कर आणि हवाई दलाने त्यांचे कार्य आणि परिचालन क्षमतेची बारकाईने तपासणी केली आहे. हे ड्रोन केवळ खूप प्रभावीच नाहीत तर त्यांचा उद्देश पूर्ण करण्यातही यशस्वी आहेत, हे या वस्तुस्थितीवरून सिद्ध होते की नौदलाने या ड्रोनची भाडेपट्टी एका वर्षासाठी वाढवली होती. इतकेच नाही तर अलीकडे बंगालच्या उपसागरात ज्या प्रकारे यापैकी एक ड्रोन कोसळले त्यानंतरही या ड्रोनची डील भारताकडून अंमलात आणली गेली आहे, म्हणजेच संरक्षण क्षेत्रातील सर्वात मोठ्या डीलपैकी एक पूर्ण झाला आहे. हे देखील सिद्ध करते की हे ड्रोन भारतासाठी खूप प्रभावी आणि महत्त्वाचे आहेत. ड्रोनच्या अपघातासाठी इतर कारणांना जबाबदार धरले गेले आहे, तर त्याची क्षमता आणि उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले नाही.

MQ-9B ड्रोनची वैशिष्ट्ये

सामरिक आणि ऑपरेशनल दृष्टिकोनातून, MQ-9B ड्रोन खूप प्रभावी आहेत आणि अनेक फायद्यांनी सुसज्ज आहेत. निःसंशयपणे, हे ड्रोन भारतीय सशस्त्र दलांसाठी प्रत्येक अर्थाने अत्यंत उपयुक्त आहेत. या ड्रोनमध्ये सॅटेलाइट कम्युनिकेशन (सॅटकॉम) स्थापित करण्याची क्षमता आहे ज्यामुळे ते विस्तृत क्षेत्रावर काम करू शकतात. म्हणजेच, जमिनीवर असो किंवा समुद्रावर, हे ड्रोन मोठ्या भागात दीर्घकाळ त्यांचे कार्य सुरळीतपणे पार पाडण्यास सक्षम आहेत. MQ-9B रीपर ड्रोन ओपन आर्किटेक्चर सिस्टमसह तयार केले गेले आहेत, म्हणजे ते आवश्यकतेनुसार सुधारित केले जाऊ शकतात. उदाहरणार्थ, हे ड्रोन विविध प्रकारच्या परदेशी आणि अगदी भारतीय निर्मित पेलोडसह एकत्र केले जाऊ शकतात. उदाहरणार्थ, ते सेन्सर्स, कायनेटिक पेलोड, गुप्तचर माहिती गोळा करणे आणि कारवाई करण्यायोग्य तंत्रज्ञानाने सुसज्ज असू शकतात. म्हणजेच, जर भारताला आपल्या धोरणात्मक आणि ऑपरेशनल गरजांनुसार या ड्रोनमध्ये काही बदल करायचे असतील तर ते करू शकतात. याव्यतिरिक्त, MQ-9B ड्रोन 40,000 फूट उंचीपर्यंत उड्डाण करू शकते आणि एकाच वेळी 40 तास काम करू शकते. अशा प्रकारे, हे प्रिडेटर ड्रोन हिंद महासागर आणि हिमालयाच्या उंचीवर लक्ष ठेवण्यासाठी योग्य आहे. इतकेच नाही तर, हे ड्रोन समुद्र आणि पृष्ठभागावर सतत पाळत ठेवण्याव्यतिरिक्त लक्ष्य देखील शोधू शकतात आणि न गमावता त्या लक्ष्यांना अचूकपणे लक्ष्य देखील करू शकतात. MQ-9B ड्रोन 4 हेलफायर क्षेपणास्त्रे, 450 किलोग्रॅम GBU-39B मार्गदर्शित ग्लाइड बॉम्ब, नेव्हिगेशन सिस्टम, सेन्सर स्वीट्स आणि मोबाइल ग्राउंड कंट्रोल सिस्टम यासारख्या अत्याधुनिक शस्त्रांनी सुसज्ज आहेत. अर्थात, भारतीय हवाई दल आणि लष्कर सध्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या (LAC) दुसऱ्या बाजूला आणि तिबेटच्या पर्वतांवर सतत लक्ष ठेवण्यास असमर्थ आहेत, जी लष्कराची मोठी कमजोरी असल्याचे म्हटले जाऊ शकते.

MQ-9B ड्रोन 40,000 फूट उंचीपर्यंत उड्डाण करू शकते आणि एकाच वेळी 40 तास काम करू शकते. अशा प्रकारे, हे प्रिडेटर ड्रोन हिंद महासागर आणि हिमालयाच्या उंचीवर लक्ष ठेवण्यासाठी योग्य आहे.

MQ-9B ड्रोनचा स्काय गार्डियन प्रकार भारतीय सशस्त्र दलाच्या ISR क्षमतेतील कमतरता, म्हणजे गुप्तचर माहिती गोळा करणे, पाळत ठेवणे आणि हेरगिरी क्षमता दूर करेल. हे स्पष्ट आहे की भारतीय सशस्त्र दलांना सीमेवरील चीनच्या हालचालींवर अचूक लक्ष ठेवण्यास सक्षम नाही. हे ड्रोन हवाई दल आणि लष्कराला वास्तविक नियंत्रण रेषेच्या आसपासच्या आणि त्यापलीकडे चिनी हालचालींचा मागोवा घेण्यास मदत करतील, तसेच तेथे उपस्थित असलेल्या चिनी लष्करी तळांना आणि गस्त घालणाऱ्यांना अचूकपणे लक्ष्य करतील. म्हणजेच, भारत आणि चीन सीमेदरम्यान येणाऱ्या डोंगराळ भागात, भारतीय हवाई दल MQ-9B स्काय गार्डियन ड्रोनच्या मदतीने केवळ अचूक पाळत ठेवू शकणार नाही तर गरज भासल्यास चिनी सैन्याला लक्ष्यही करू शकेल.

त्याचप्रमाणे, MQ-9B प्रिडेटर ड्रोन म्हणजेच सी गार्डियन ड्रोनचा नौदल प्रकार देखील अनेक वैशिष्ट्यांसह सुसज्ज आहे. त्याची 80 लाखांहून अधिक उड्डाण तासांची क्षमता आहे आणि त्याचा खर्च मानवयुक्त विमानापेक्षा 86 टक्के कमी आहे. सी गार्डियन ड्रोन ऑपरेट करणे अत्यंत सोपे आहे, ते सर्व प्रकारच्या हवामानात सहजपणे ऑपरेट केले जाऊ शकते. त्याच वेळी, नागरी हवाई वाहतुकीशी सुसंगत असलेल्या जमिनीवरील लढाईत आणि इलेक्ट्रॉनिक युद्धात (Electronics War) देखील याचा सहजपणे वापर केला जाऊ शकतो. प्रत्युत्तरात्मक हवाई हल्ल्यांमध्ये सी गार्डियन ड्रोन देखील खूप उपयुक्त आहेत. याशिवाय हे ड्रोन आव्हानात्मक आणि कठीण परिस्थितीतही चालवले जाऊ शकते. उदाहरणार्थ, सॅटकॉमने सुसज्ज सी गार्डियन ड्रोनचा वापर पाणबुडीविरोधी युद्धात (ASW) म्हणजे शत्रू पाणबुड्यांचा शोध घेणे, त्यांचा मागोवा घेणे आणि लक्ष्य करणे यासाठी देखील केला जाऊ शकतो. या ड्रोनचा वापर ASW हेलिकॉप्टर्ससारख्या एकात्मिक मोहिमांमध्ये देखील केला जाऊ शकतो. MH-60 रोमियो मल्टी-मिशन हेलिकॉप्टर्स सध्या भारतीय नौदलाद्वारे पाणबुडीविरोधी मोहिमांमध्ये वापरल्या जातात आणि हे ड्रोन या हेलिकॉप्टर्सशी देखील सहजपणे समन्वय साधू शकतात. MH-60 रोमियो मल्टी-मिशन हेलिकॉप्टर्स शत्रूच्या पाणबुडीचे संचालन अपेक्षित असलेल्या सागरी भागात सोनोबॉय टाकू शकतात, तर सी गार्डियन ड्रोन त्याच्या सेन्सर्सच्या मदतीने संपूर्ण सागरी क्षेत्रावर लक्ष ठेवू शकते आणि शत्रूच्या पाणबुडीच्या हालचाली आणि ऑपरेशनचा मागोवा घेऊ शकते. म्हणजेच, सी गार्डियन ड्रोनद्वारे जी काही माहिती गोळा केली जाते, ती हेलिकॉप्टरमधून शत्रू पाणबुडीवर अचूक हल्ला करण्यासाठी वापरली जाऊ शकते.

अमेरिकन कंपनीला हे ड्रोन भारताला पुरवण्यासाठी किमान चार ते सहा वर्षे लागतील. तसेच, या ड्रोनच्या लॉजिस्टिक्सशी संबंधित निर्णय त्यांचा वापर आणि भविष्यातील कामगिरीनुसार अंमलात आणले जातील. महत्त्वाचे म्हणजे, हे प्रगत ड्रोन देशाच्या सशस्त्र दलांना त्यांची क्षमता आणि क्षमतेच्या बळावर अशा क्षेत्रांमध्ये बळकट करू शकतात जिथे येत्या दशकांमध्ये भारताला मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. अलीकडेच भारत संयुक्त सागरी दलाचा (CMF) सदस्य बनला आहे अमेरिकेच्या नेतृत्वाखालील 45 देशांचे संयुक्त सागरी दल सध्या फार मजबूत स्थितीत नाही. संयुक्त सागरी दल हे पश्चिम हिंद महासागर प्रदेशातील सुरक्षा सहकार्यासारखे आहे, जे या सागरी प्रदेशातील सदस्य देशांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी काम करते. MQ-9B ड्रोन तैनात करून भारत क्वाड देशांशी आणि हिंद महासागर प्रदेशात (IOR) शांतता आणि स्थैर्य राखण्यासाठी वचनबद्ध असलेल्या विविध लोकशाहीशी संवाद साधू शकतो म्हणजेच, भारत आपल्या मानवतावादी सहाय्य आणि आपत्ती निवारण (HADR) उपक्रम, शोध आणि बचाव कार्य, शत्रूकडून हवाई आणि सागरी धोक्यांचा इशारा, पाणबुडीविरोधी युद्ध आणि अशा इतर अनेक कामांमध्ये योगदान देऊ शकतो. याशिवाय, MQ-9B ड्रोन अरबी समुद्र आणि वायव्य हिंद महासागरासारख्या दुर्गम भागात भारताची हल्ला करण्याची क्षमता लक्षणीयरीत्या वाढवू शकतात. आखाती प्रदेशातील आंतरराष्ट्रीय सागरी मार्गांवर हौथी बंडखोरांनी केलेल्या हल्ल्यांमध्ये भारतीय नौदलाने आपली ताकद दाखवून दिली आहे हे स्पष्ट आहे. अशा परिस्थितीत जेव्हा MQ-9B ड्रोन नौदलाच्या ताफ्यात सामील होतील, तेव्हा आखाती प्रदेशातील सागरी भागात भारताची पाळत ठेवण्याची आणि हल्ला करण्याची क्षमता निश्चितच वाढेल.

भारत-अमेरिका द्विपक्षीय संबंधांमध्ये तंत्रज्ञानाचे हस्तांतरण (TOT) हा एक प्रमुख मुद्दा आहे. अधिकाऱ्यांची ढिसाळ वृत्ती आणि कोणत्याही सहकारी आघाडीत अनिवार्य मार्गांचा अभाव लक्षात घेता, तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणात अनेक अडचणी आहेत.

अमेरिकेबरोबर ड्रोन खरेदी करारावर स्वाक्षरी केल्याने भारताला त्याची गुप्तचर, पाळत ठेवणे आणि हेरगिरी क्षमता वाढविण्यात मदत होईल, म्हणजे ISR शी संबंधित त्रुटी दूर करण्यासाठी, ड्रोनची देखभाल, दुरुस्ती आणि दुरुस्ती सुविधा (MRO) विकसित करण्याचा करार भारतातच भविष्यात देशातील UAV क्षेत्रातील देशांतर्गत क्षमता बळकट करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. भारत-अमेरिका द्विपक्षीय संबंधांमध्ये तंत्रज्ञानाचे हस्तांतरण (TOT) हा एक प्रमुख मुद्दा आहे. अधिकाऱ्यांची ढिसाळ वृत्ती आणि कोणत्याही सहकारी आघाडीत अनिवार्य मार्गांचा अभाव लक्षात घेता, तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणात अनेक अडचणी आहेत. ड्रोनचे उत्पादन, दुरुस्ती आणि देखभालीसाठीची परिसंस्था विकसित केली गेली तर तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणातील अडथळे सहजपणे दूर करता येतील. दुसरीकडे, अमेरिकेने यापूर्वीच भारताला प्रमुख संरक्षण भागीदार (एमडीपी) चा दर्जा दिला आहे आणि त्याअंतर्गत हा ड्रोन करार भारतासोबत करण्यात आला आहे.

यामुळे हे स्पष्ट होते की या ड्रोनशी संबंधित संवेदनशील तंत्रज्ञान हस्तांतरित करण्यात भारताला कोणतीही अडचण येणार नाही, कारण त्यासाठी अमेरिकेला भारताशी कोणतेही विशेष सहकार्य स्थापित करण्याची किंवा कोणताही स्वतंत्र धोरणात्मक करार करण्याची आवश्यकता नाही. अर्थात, कधीकधी अशा सौद्यांसाठी तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणासाठी अमेरिकी काँग्रेसच्या मंजुरीची आवश्यकता असते, जी भारताबरोबरच्या या ड्रोन करारात अजिबात आवश्यक नाही.

# शहरातील हवा धोकायदायक पातळीवर नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम

■ मुंबई

वाऱ्यांचा वेग कमी होताच मुंबईतील हवेचा दर्जा खालावू लागला आहे व मुंबईत धुलीकणांच्या प्रमाणाने धोकादायक पातळी गाठली आहे. सध्या शहरातील हवा धोकायदायक असून नागरिकांच्या आरोग्यावर त्याचे परिणाम दिसून येत आहेत. समीर ॲपच्या नोंदीनुसार, शहरातील हवेचा दर्जा गेल्या काही दिवसांपासून वाईट श्रेणीत नोंदला

जात असून शिवडी, नेव्ही नगर कुलाबा, वरळी आणि वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) येथे बुधवारी सायंकाळी वाईट हवेची नोंद झाली. या सर्व भागातील हवा निर्देशांक २०० च्यावर नोंदला गेला होता.

सतत वाढत असलेल्या प्रदूषणामुळे मुंबईतील हवेचा दर्जा खालावत जात आहे. समीर ॲपच्या नोंदीनुसार, बुधवारी सायंकाळी शिवडी येथील हवा निर्देशांक २३२ तर वरळी येथील २११ इतका होता.

विदेश मंत्री एस जयशंकर ने रविवार को कहा कि इस समय अधिक विविधतापूर्ण, बहुध्रुवीय दुनिया की तरफ रुझान बना हुआ है लेकिन पुरानी, औद्योगिक अर्थव्यवस्थाओं का दौर खत्म नहीं हुआ है और अभी भी ये निवेश का प्रमुख लक्ष्य बनी हुई हैं. जयशंकर ने आदित्य बिड़ला समूह की तरफ से दी जाने वाली छात्रवृत्ति योजना के रजत जयंती समारोह में कहा कि डोनाल्ड ट्रंप के राष्ट्रपति के रूप में वापसी के बाद तमाम देश अमेरिका को लेकर थोड़े घबराए हुए हैं, लेकिन भारत उनमें से एक नहीं है.



विदेश मंत्री ने भारत-अमेरिका संबंधों और ट्रंप की जीत पर कहा, 'प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी संभवतः उन पहले तीन लोगों में थे, जिनसे नव-निर्वाचित राष्ट्रपति ट्रंप ने बात की.'

उन्होंने कहा कि भारत और प्रधानमंत्री मोदी ने कई राष्ट्रपतियों के साथ तालमेल बनाया है. उन्होंने कहा, 'आज बहुत सारे देश अमेरिका को लेकर घबराए हुए हैं.... लेकिन हम उनमें से नहीं हैं.'

उन्होंने वैश्विक शक्ति की गतिशीलता के बारे में पूछे जाने पर कहा, 'हां, बदलाव हुआ है. हम खुद इस बदलाव का उदाहरण हैं, अगर आप हमारे आर्थिक वजन को देखते हैं तो आप हमारी आर्थिक रैंकिंग को देखते हैं. आप भारतीय कॉरपोरेट जगत, उनकी पहुंच, उनकी मौजूदगी, भारतीय पेशेवरों को देखते हैं. इसमें कोई संदेह नहीं है कि पुनर्संतुलन हुआ है.'

इसके साथ ही उन्होंने कहा कि ऐसा होना अपरिहार्य भी था. उन्होंने कहा, 'औपनिवेशिक काल के बाद देशों को स्वतंत्रता मिली और उन्होंने अपनी नीतियां खुद चुननी शुरू कर दी थीं. फिर उनका आगे बढ़ना भी तय था. इनमें से कुछ तेजी से बढ़े, कुछ धीमी गति से बढ़े, कुछ बेहतर तरीके से बढ़े, और वहां शासन की गुणवत्ता और नेतृत्व की गुणवत्ता आई.'

विदेश मंत्री ने अपने संबोधन में कहा, 'अधिक विविधतापूर्ण, बहुध्रुवीय दुनिया की ओर रुझान है. लेकिन, एक ऐसा दौर भी है जब देश वास्तव में आगे बढ़ते हैं. मेरा मतलब है, यह वैसा ही है जैसा कॉरपोरेट जगत में भी हुआ.'

इसके साथ ही जयशंकर ने इस बात पर बल दिया कि पश्चिम में औद्योगिक अर्थव्यवस्थाओं को नजरअंदाज नहीं किया जा सकता है और वे प्रमुख निवेश लक्ष्य बने हुए हैं.

उन्होंने कहा, 'पुरानी, पश्चिमी अर्थव्यवस्थाएं, पुरानी औद्योगिक अर्थव्यवस्थाएं खत्म नहीं हुई हैं. वे अभी भी मायने रखती हैं और वे प्रमुख निवेश लक्ष्य हैं. वे बड़े बाजार हैं, मजबूत प्रौद्योगिकी केंद्र हैं, नवाचार के केंद्र हैं.'

इस कार्यक्रम में आदित्य बिड़ला समूह के प्रमुख कुमार मंगलम बिड़ला ने कहा कि छात्रवृत्ति कार्यक्रम का उल्लेख करते हुए कहा कि प्रतिभा में निवेश ही भविष्य को आकार देता है.

बिड़ला ने अपने दिवंगत पिता आदित्य विक्रम बिड़ला की स्मृति में 1999 में स्थापित इस छात्रवृत्ति के योगदान का जिक्र करते हुए कहा कि इसकी मदद से अब तक सैकड़ों युवा विभिन्न क्षेत्रों में अपना परचम लहराने में सफल रहे हैं.

# कोलकाता में शिशुओं की तस्करी गिरोह का भंडाफोड़, दंपती गिरफ्तार

**कोलकाता**
कोलकाता में लंबे समय से चल रहे नवजात शिशु तस्करी मामले में बंगाल पुलिस के आपराधिक जांच विभाग (सीआइडी) ने रविवार को एक दंपती को गिरफ्तार तस्करी करने वाले गिरोह का भंडाफोड़ किया है। गिरफ्तार लोगों में माणिक हलदर और उसकी पत्नी मुकुल सरकार शामिल हैं। आशंका जताई जा रही है कि तस्करी के तार देश के विभिन्न हिस्सों और पड़ोसी देश बांग्लादेश से जुड़े हो सकते हैं।

सूत्रों के मुताबिक सीआईडी को नवजात शिशुओं की तस्करी की खबर मिली थी। अधिकारियों ने बच्चा गोद लेने के बहाने आरोपियों से संपर्क किया। रविवार को शालीमार स्टेशन पर चार लाख रुपए में एक नवजात शिशु की डील हुई। नवजात को लेकर जैसे ही दोनों मौके पर पहुंचे, वहां तैनात सीआईडी ने उन्हें पकड़ लिया। उनके पास से दो दिन का नवजात बरामद किया गया। पूछताछ में आरोपियों ने बताया कि बिहार के गया से स्थानीय सहयोगियों की मदद से बच्चे को चुराया गया था।

# बाबा सिद्दीकी हत्याकांड का मुख्य शूटर शिवकुमार गिरफ्तार

**मुंबई**
बाबा सिद्दीकी हत्याकांड का आखिरकार मुख्य शूटर शिवकुमार गिरफ्तार हो गया. यूपी पुलिस की पूछताछ में उसने कत्ल के कई राज खोल दिए. शिवकुमार ने पूछताछ में बताया कि अनुराग कश्यप और वो एक ही गांव के हैं. पुणे में स्क्रैप के कारखाने में एक साथ काम करते थे.शिवकुमार और शुभम लोनकर दोनों ही अलग अलग स्क्रैप की दुकान में काम करते थे. शुभम लोनकर लॉरेंस बिश्नोई के लिए काम करता है. शिवकुमार ने अपने बयान में यह भी बताया है कि शुभम ही वो व्यक्ति था, जिसने उसकी बात स्नैप चैट के ज़रिए लॉरेंस बिश्नोई के भाई अनमोल बिश्नोई से करवाई थी.

क्राइम ब्रांच सूत्रों के अनुसार शिव कुमार ने यह भी बताया है कि बाबा सिद्दीकी की हत्या करने के बाद उससे वादा किया गया था की दस लाख रुपये उसे मिलेंगे. इसके साथ ही हर महीने कुछ न कुछ मिलता ही रहेगा. हत्या के लिए पिस्टल और गोलियां, सिम व मोबाइल फोन शुभम लोनकर ने ही दिया था. शिवकुमार ने यह भी



बताया कि वे कई दिनों तक मुंबई में थे और बाबा सिद्दीकी की रेकी कर रहे थे. 12-10-2024 की रात में सही समय मिलने पर बाबा सिद्दीकी की हत्या कर दी गई.

शिवकुमार ने बताया कि उस दिन त्यौहार होने के कारण पुलिस व भीड़-भाड़ थी, जिसके कारण दो लोग मौके पर पकड़े गये थे और वह फरार हो गया था.सूत्रों के अनुसार शिवकुमार ने बताया कि उसने फोन रास्ते में फेंक दिया था और मुंबई से पुणे चला गया था. पुणे से झांसी व लखनऊ के रास्ते बहराइच पहुंचा था.अनुराग कश्यप से मैंने ट्रेन के एक यात्री से फोन मांग कर बात की थी तो उसने कहा था अखिलेशेंद्र, ज्ञान प्रकाश व आकाश ने मिलकर नेपाल में छिपने के व्यवस्था करवा दी है. इसलिये वो बहराइच आया था और अपने साथियों के साथ मिलकर नेपाल भागने की फिराक में था.

# शादी कार्ड पर छापा यूपी के सीएम योगी का 'बंटोगे तो कटोगे' नारा, अब हो रही हर जगह चर्चा



**लखनऊ**
उत्तर प्रदेश के मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ का नारा 'बंटोगे तो कटोगे' चर्चा का विषय बना हुआ है. अब गुजरात के भावनगर में एक व्यक्ति ने अपने शादी के कार्ड पर इस नारे को छपवाया है और उसके साथ मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ के साथ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी की तस्वीर भी छपवाई है. पूरा मामला गुजरात के भावनगर जिले की महुवा तहसील के वांगर गांव का है. जहां पर एक भाजपा कार्यकर्ता के घर 23 नवंबर को शादी होनी है. शादी के लिए तैयार किए गए निमंत्रण कार्ड पर सीएम योगी का चर्चित नारा 'बंटोगे तो कटोगे' छपवाया गया है, जिसमें हिंदू समुदाय को एकजुट करने की बात कही गई है. पूरे प्रदेश भर में इस कार्ड की चर्चा की जा रही है.

चुनावी राज्य महाराष्ट्र और झारखंड में भी योगी के इस नारे पर राजनीतिक पार्टियां आमने-सामने हैं.उत्तर प्रदेश की नौ विधानसभा सीटों पर होने वाले उपचुनाव में भी इस नारे का असर देखने को मिल सकता है.

भाजपा कार्यकर्ता ने बताया कि उसने लोगों को जागरूक करने और पीएम मोदी के संदेश को फैलाने के मकसद से ये नारा छपवाया है. कार्ड में पीएम मोदी, सीएम योगी और राम मंदिर का डिजाइन भी बनवाया गया है.

गौरतलब है कि झारखंड में एक रैली को संबोधित करते हुए मुख्यमंत्री योगी ने कहा था, "अपनी ताकत का एहसास कराएं, जातियों में बंटना नहीं है. जाति के नाम पर कुछ लोग आपको बांटेंगे, कांग्रेस और विपक्ष यही काम करती है. ये लोग बांग्लादेशी घुसपैठियों, रोहिंग्या को बुला रहे हैं. एक दिन ये लोग आपके घर के अंदर घंटी और शंख भी नहीं बजाने देंगे. इसलिए एक रहिए और नेक रहिए. मैं तो कहता हूं कि देश का इतिहास गवाह है जब भी बंटे हैं, निर्ममता से कटे हैं.'

# महाराष्ट्र चुनाव : कांग्रेस ने 16 बागी उम्मीदवारों के खिलाफ की कार्रवाई, छह साल के लिए किया सस्पेंड

**नई दिल्ली:**
महाराष्ट्र में विधानसभा चुनाव से पहले कांग्रेस ने पार्टी के 16 बागी उम्मीदवारों के खिलाफ कार्रवाई की. कांग्रेस ने रविवार को पार्टी से बगावत करके विधानसभा चुनाव लड़ रहे 16 प्रत्याशियों को पार्टी से छह साल के लिए निष्कासित कर दिया. महाराष्ट्र कांग्रेस के अध्यक्ष नाना पटोले के निर्देश पर पार्टी ने एक आदेश जारी करके बागियों को सस्पेंड कर दिया है.

महाराष्ट्र में विधानसभा चुनाव के लिए सिर्फ 10 दिन बाकी हैं. राज्य में 20 नवंबर को मतदान होगा और 23 नवंबर को मतगणना के बाद नतीजे घोषित किए जाएंगे. राज्य में सत्ताधारी गठबंधन शिवसेना (एकनाथ शिंदे), बीजेपी, एनसीपी (अजित पवार) का मुकाबला विपक्ष के गठबंधन महाविकास अघाड़ी (MVA) से है. एमवीए में शिवसेना (यूबीटी), एनसीपी (शरद पवार) और कांग्रेस शामिल है.

समाचार एजेंसी आईएएनएस के मुताबिक, महाराष्ट्र विधानसभा चुनाव से पहले मैटराइज सर्वे सामने आया है. इसमें राज्य में महायुति या महाविकास अघाड़ी में से किसकी सरकार बनने जा रही है? इसका अनुमान लगाया गया है. मैटराइज सर्वे के मुताबिक महाराष्ट्र में भाजपा, एकनाथ शिंदे के नेतृत्व वाली शिवसेना और अजित पवार की एनसीपी वाले गठबंधन 'महायुति' की राज्य में सरकार बनने का अनुमान है. जबकि, कांग्रेस, शिवसेना (यूबीटी) और एनसीपी (एसपी) को झटका लग सकता है.

सर्वे के अनुसार महाराष्ट्र की 288 विधानसभा सीटों में से महायुति गठबंधन को 145 से 165 सीटें मिलने का अनुमान है, जबकि विपक्षी एमवीए को 106 से 126 सीटें मिलने की संभावना जताई गई है.

वोट शेयर के मामले में सत्तारूढ़ महायुति गठबंधन के विपक्ष पर भारी पड़ने की संभावना है. भाजपा के नेतृत्व वाले गठबंधन को 47 प्रतिशत वोट शेयर मिलने की संभावना है, जबकि कांग्रेस के नेतृत्व वाले गठबंधन को 41% वोट शेयर मिलने की उम्मीद है. सर्वे में अन्य को 12% तक वोट शेयर मिलने के कयास लगाए गए हैं.

मैटराइज के सर्वे में भाजपा को पश्चिमी महाराष्ट्र, विदर्भ और ठाणे-कोंकण क्षेत्रों में भारी जनसमर्थन मिलता दिख रहा है, जहां उसे क्रमशः 48%, 48% और 52% वोट शेयर मिलने की संभावना है. कांग्रेस के नेतृत्व वाली एमवीए को उत्तर महाराष्ट्र और मराठवाड़ा जैसे क्षेत्रों में 47% और 44% वोट शेयर मिलने की संभावना है.

मैटराइज सर्वे के अनुसार, महाराष्ट्र के मुख्यमंत्री के लिए एकनाथ शिंदे सबसे पसंदीदा चेहरा बने हुए हैं. महाराष्ट्र के लोगों से जब ये पूछा गया कि सीएम पद के लिए उनकी पसंद कौन है तो 40% लोगों ने एकनाथ शिंदे के पक्ष में सहमति जताई है, वहीं उद्धव ठाकरे 21% और देवेंद्र फडणवीस को 19% लोगों ने सीएम फेस के लिए समर्थन दिया. 65% से अधिक लोगों ने शिंदे के कामकाज से संतुष्टि जताई है, जिसमें 42% ने बहुत अच्छा और 27% ने औसत बताया है.

लोकसभा चुनावों में भाजपा के नेतृत्व वाली महायुति के खराब प्रदर्शन के संभावित कारणों पर पूछे जाने पर, लगभग 48% लोगों ने इसका कारण शिवसेना और राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी (एनसीपी) में विभाजन को बताया है.

मैटराइज का यह सर्वे 10 अक्टूबर से 9 नवंबर के बीच में किया गया है. सैंपल साइज की बात करें तो सर्वे में राज्य के 1,09,628 लोगों की राय ली गई है. इसमें 57 हजार से अधिक पुरुष, 28 हजार महिलाएं और 24 हजार युवाओं की राय शामिल हैं.

## दूसरी पत्नी से हुआ झगड़ा, पहली बीवी के बेटा-बेटी को झील में फेंका, फिर खुद भी कूद गया

**हैदराबाद**
तेलंगाना के सिद्दीपेट कस्बे में एक व्यक्ति ने अपने दो बच्चों के साथ झील में कूदकर आत्महत्या कर ली. पुलिस के अनुसार, सत्यम (48) अपने बेटे अन्वेश (7) और बेटी त्रिवेणी (5) के साथ कस्बे के चिनतल चेरुवु झील में कूद गया.

पुलिस ने रविवार को स्थानीय लोगों की मदद से शवों को झील से बाहर निकाला. माना जा रहा है कि सत्यम ने अपनी जान देने के लिए उसी झील में कूदने से पहले दो बच्चों को झील में फेंक दिया. पुलिस को संदेह है कि पारिवारिक समस्याओं के कारण उसने आत्महत्या की है. बताया जा रहा है कि सत्यम अपनी दूसरी पत्नी के साथ झगड़े के बाद घर छोड़कर चला गया था और अपने माता-पिता के साथ रह रहा था, इसके बाद से वह निराश था. इसके बाद उसने अपनी पहली पत्नी के बच्चों के साथ आत्महत्या कर ली. एक अन्य घटना में, रविवार को जगतियाल जिले में एक सड़क दुर्घटना में दो लोगों की मौत हो गई. यह दुर्घटना तब हुई, जब चार लोगों वाली एक कार को तेलंगाना राज्य 'सड़क परिवहन निगम' (टीजीएसआरटीसी) की बस ने टक्कर मार दी. पुलिस के अनुसार, यह दुर्घटना जगतियाल शहर के पास धारुर रोड पर हुई.

## अमेरिका में इस्कॉन की रथ यात्रा से पुरी गोवर्धन पीठ नाराज, प्रतिबंध की मांग

**भुवनेश्वर**
ओडिशा सरकार और पुरी के गजपति महाराज ने इस्कॉन की आलोचना की है। इस्कॉन ने आश्वासन दिया था कि वह भारत के बाहर असामयिक रथ यात्रा आयोजित नहीं करेगी, लेकिन इस्कॉन ने 9 नवंबर को अमेरिका के ह्यूस्टन में 'रथ यात्रा' का आयोजन कर अपने आश्वासन को तोड़ दिया।

इस आयोजन में इस्कॉन ने भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र, देवी सुभद्रा और सुदर्शन चक्र की मूर्तियों के बिना भगवान जगन्नाथ के रथ की एक प्रतिकृति परेड में शामिल की। यह परेड इस्कॉन के 'आनंद उत्सव' के तहत आयोजित की गई थी। इस परेड को लेकर पुरी गोवर्धन पीठ के प्रवक्ता मातृ प्रसाद मिश्रा ने आलोचना की है। उन्होंने इस घटना की निंदा करते हुए इसे 'हमारे धर्म के खिलाफ एक साजिश' बताया। उन्होंने भारत में अंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन) पर प्रतिबंध लगाए जाने की मांग की। मिश्रा ने कहा कि इस्कॉन ने जो आश्वासन दिया था, उसे तोड़कर उन्होंने इस आयोजन को किया, जो गलत है।

मामले पर निर्णय लेगा श्री जगन्नाथ मंदिर प्रशासन: पृथ्वीराज हरिचंदन


ओडिशा सरकार के कानून मंत्री पृथ्वीराज हरिचंदन ने कहा कि श्री जगन्नाथ मंदिर प्रशासन इस मामले पर निर्णय लेगा। उन्होंने कहा कि मंदिर प्रशासन इस मामले पर जो भी फैसला करेगा, राज्य सरकार उसका समर्थन करेगी।

इस बीच, ह्यूस्टन इस्कॉन के प्रमुख सारंग ठाकुर दास ने संस्था की वेबसाइट पर अपलोड किए गए एक बयान में कहा कि मंदिर ने शुरू में देवताओं के साथ रथ यात्रा की योजना बनाई थी, लेकिन स्थानीय समुदाय में हमारे कुछ मित्रों ने चिंता जताई थी, इसलिए हमने योजना में थोड़ा बदलाव करने का फैसला किया।

उन्होंने कहा, 'इस्कॉन के लिए उत्सव में भाग लेने वालों को भगवान जगन्नाथ के दर्शन का अवसर प्रदान करना इस आयोजन की मुख्य विशेषता है। हालांकि, अन्य लोगों के लिए प्राचीन परंपरा और कैलेंडर का अनुपालन प्राथमिकता है।' उन्होंने यह भी बताया कि आने वाले समय में इस्कॉन और पुरी के अधिकारियों के बीच इस मुद्दे पर बैठक होगी, जिसमें समझौता किया जाएगा।

# कांग्रेस ने झारखंड भाजपा के खिलाफ चुनाव आयोग में दर्ज कराई शिकायत

**रांची**
कांग्रेस ने रविवार को राज्य भाजपा के खिलाफ चुनाव आयोग एक शिकायत दर्ज कराई। पार्टी ने इसमें झारखंड के मुख्यमंत्री हेमंत सोरेन, कांग्रेस नेता राहुल गांधी और राष्ट्रीय जनता दल (राजद) के नेता तेजस्वी यादव पर आधारित एक विज्ञापन पर आपत्ति जताई है। कांग्रेस ने आरोप लगाया कि इस विज्ञापन में इन नेताओं के खिलाफ बेबुनियाद आरोप लगाए गए हैं और उन्हें नकारात्मक तरीके से पेश किया गया है, जिसका मकसद झूठे प्रचार को फैलाना है।



पार्टी महासचिव जयराम रमेश ने चुनाव आयोग को एक ज्ञापन सौंपा, जिसमें उन्होंने भाजपा से यह विज्ञापन तत्काल हटाने की मांग की। उन्होंने कहा कि भाजपा झारखंड के आधिकारिक फेसबुक पेज पर प्रकाशित यह विज्ञापन आदर्श चुनाव आचार संहिता और अन्य चुनावी कानूनों का उल्लंघन करता है।

इस विज्ञापन में झारखंड मुक्ति मोर्चा (झामुमो), कांग्रेस और राष्ट्रीय जनता दल (राजद) के नेताओं को आदिवासी विरोधी के रूप में दिखाया गया गया है। इसमें बताया गया है कि कैसे ये नेता अब आदिवासी वोट हासिल करने की कोशिश कर रहे हैं। रमेश ने कहा कि विज्ञापन में इन नेताओं को नकारात्मक तरीके से पेश किया गया है। रमेश ने चुनाव आयोग से इस विज्ञापन को तत्काल हटाने और भाजपा के खिलाफ कार्रवाई की मांग की। उन्होंने कहा कि इस विज्ञापन में जिन आरोपों का जिक्र किया गया है, वह पूरी तरह से झूठे हैं और इनका मकसद विपक्षी दलों के खिलाफ मतदाताओं को भड़काना है, ताकि भाजपा को राज्य में चुनावी लाभ मिल सके।

उन्होंने यह भी कहा कि झारखंड में विधानसभा चुनाव प्रक्रिया जारी है, इसलिए भाजपा को इस विज्ञापन के लिए चुनाव आयोग से पहले अनुमति लेनी चाहिए थी। रमेश ने आयोग से यह भी अनुरोध किया कि वह सभी वीडियो हटाने के लिए तुरंत कार्रवाई करे और भाजपा के आधिकारिक फेसबुक पेज के खिलाफ सख्त कदम उठाए। झारखंड विधानसभा चुनाव के लिए दो चरणों में 13 और 20 नवंबर को मतदान होने हैं। मतगणना 23 नवंबर को होगी।

# फर्जी खबरों पर लगाम लगाएगी संसदीय समिति

**नई दिल्ली**
संसद की संचार एवं सूचना प्रौद्योगिकी समिति फर्जी खबरों पर लगाम लगाएगी। इसलिए संसदीय समिति ने मीडिया निकाय न्यूज ब्रॉडकास्टर्स एंड डिजिटल एसोसिएशन और एडिटर्स गिल्ड ऑफ इंडिया को सुझाव देने के लिए बुलाया है।



बताया जाता है कि संचार और सूचना प्रौद्योगिकी की स्थायी समिति 21 नवंबर को फर्जी खबरों पर अंकुश लगाने के तंत्र की समीक्षा विषय पर बैठक करेगी। संसदीय समिति के अध्यक्ष भाजपा सांसद निशिकांत दुबे हैं। बैठक में समिति न्यूज ब्रॉडकास्टर्स एंड डिजिटल एसोसिएशन (एनबीडीए) और एडिटर्स गिल्ड ऑफ इंडिया (ईजीआई) के विचार सुनेगी।

समिति ने पहले फर्जी खबरों पर अंकुश लगाने के तंत्र के साथ-साथ ओटीटी प्लेटफार्मों से जुड़े मुद्दों की समीक्षा करने का निर्णय लिया था। इसके अलावा समिति भारत में क्रिप्टोकरेंसी की मौजूदगी के साथ समिति मुद्राओं के नए रूपों से उभरने और उनके प्रभाव की भी जांच करेगी। समिति का पैनल आर्टिफिशियल इंटेलीजेंस के उभरने और संबंधित मुद्दों के प्रभाव को लेकर भी बात करेगी।

समिति को सूचना और प्रसारण, इलेक्ट्रॉनिक्स, सूचना प्रौद्योगिकी और संचार मंत्रालयों के कामकाज की जांच करने का अधिकार है। अब समिति ने सभी तरह के मीडिया से जुड़े कानूनों के क्रियान्वयन की समीक्षा के साथ-साथ प्रसार भारती के कामकाज की समीक्षा को भी चुना है। डिजिटल और साइबर अपराध को लेकर समिति विनियमन और निगरानी पर भी गौर करेगी।

# ...तर मविआचे कार्यकर्ते फडणवीस, अजित पवारांच्या बॅगा तपासतील- उद्धव ठाकरे

■ वणी



राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे अवघ्या देशाचं लक्ष लागलेलं आहे. या विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. सध्या प्रचाराचा धडाका सुरु असून प्रचारासाठी दिल्लीतील दिग्गज नेते महाराष्ट्रात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आज माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची वणी या ठिकाणी जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना त्यांनी महायुतीच्या नेत्यांवर जोरदार हल्लाबोल केला.

दरम्यान, उद्धव ठाकरे हे सभेसाठी दाखल झाले असता निवडणूक अधिकाऱ्यांकडून त्यांच्या बॅगेची तपासणी करण्यात आली. यामुळे उद्धव ठाकरे यांनी सभेत बोलताना निवडणूक अधिकाऱ्यांना इशारा देत काही सवाल विचारले. 'तुम्ही जशी माझी बॅग तपासली, तशीच पंतप्रधान मोदी, अमित शाह, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या बॅगा तपासल्या का? असा सवाल करत आता जर निवडणूक अधिकारी त्यांच्या बॅगा तपासणार नसतील तर महाविकास आघाडीचे कार्यकर्ते त्यांच्या बॅगा तपासतील', असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

"मला जास्त भाषणे करण्याची गरज नाही. कारण लोक सांगत आहेत की, तुम्हाला विजय दिला. फक्त २० तारखेला कोणालाही डोळ्यावर पट्टी बांधू देऊ नका. आता आपल्या न्यायदेवतेच्या डोळ्यावरची पट्टी देखील काढली. त्यामुळे तुमच्याही डोळ्यावर पट्टी असण्याची गरज नाही. तुम्ही डोळसपणे मतदान करा. मी कोणत्याही माणसांना दोष देत नाही, तर मी यंत्रणेला दोष देत आहे. मी हेलिकॉप्टरने आलो तेव्हा माझ्या स्वागतासाठी ८ ते १० जण उभे होते. मी त्यांना विचारलं की काय करायचंय? ते म्हणाले बॅग तपासायची. त्यांना म्हटलं तपासा. आता जे तुमची तपासणी करतात त्यांची ओळखपत्र देखील तुम्ही तपासा. तसेच ते जसे तुमचे खिसे वैगेरे तपासतात तसं तुम्ही देखील त्यांचे खिसे तपासा. हा आपला अधिकार आहे. तुम्हाला जर तपासणी अधिकाऱ्यांनी आडवलं तर तर अधिकाऱ्यांच्या ओळखपत्रासह त्यांचे खिसे देखील तपासा, हा तुमचा अधिकार आहे", असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

"मी यंत्रणेला सांगतो, तुम्ही जशी माझी बॅग तपासली, तशीच पतंप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांची बॅग तपासली का? तपासायला हवी की नको? दाढीवाल्या शिंदेंची तपासायला हवी की नको? गुलाबी जॅकेटवाल्यांची तपासायला हवी की नको? फडणवीसांची बॅग तपासायला हवी की नको? पंतप्रधान मोदी महाराष्ट्रात सभेसाठी येतात. मोदी आल्यानंतर रस्ते बंद होतात. मग हे रस्त्याने सुसाट जातात. मात्र, पंतप्रधान मोदी असो किंवा अमित शाह असोत किंवा देवेंद्र फडणवीस, अजित पवार असोत. यांच्या बॅगा जर निवडणूक अधिकारी तपासणार नसतील तर महाविकास आघाडीचे कार्यकर्ते त्यांच्या बॅगा तपासतील. मग मात्र, पोलिसांनी मधे यायचं नाही. निवडणूक अधिकाऱ्यांनी मधे यायचं नाही. आमच्या बॅगा तपासण्याचा अधिकार जसा तुम्हाला आहे, तसं प्रचाराला जो कोणी येईन त्याची बॅग तपासण्याचा अधिकार मतदारांना आहे", असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# तुम्ही अडीच वर्षांत काय केले? समोरासमोर येऊन चर्चा करा एकनाथ शिंदेंचे आव्हान

■ वैजापूर

राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी




अशी मुख्य लढत पाहायला मिळत असून सध्या विविध मतदारसंघात दिग्गज नेत्यांच्या प्रचार सभा पार पडत आहेत. या सभेच्या माध्यमातून आपल्या उमेदवारांना निवडून देण्यासाठी नेत्यांकडून जनतेला आवाहन करण्यात येत आहे. याबरोबरच प्रचारसभांमधून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय टीका टीप्पणी आणि आरोप-प्रत्यारोपही सुरु आहेत.

अशातच आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीला थेट समोरासमोर येऊन चर्चा करण्याचं आव्हान दिलं आहे. वैजापूरमध्ये रमेश बोरनारे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलताना त्यांनी यासंदर्भात भाष्य केलं. "महाविकास आघाडीने अडीच वर्षात काय केलं, आणि आम्ही काय केलं. याची खुली चर्चा करायला मी तयार आहे. मात्र, विरोधक हे आव्हान स्वीकारायला नाही. कारण त्यांनी अडीच वर्षांत काहीही केलं नाही", अशी टीका त्यांनी केली.

पुढे बोलताना त्यांनी विरोधकांवर जोरदार टीकास्त्र सोडलं. "महाविकास आघाडीच्या सरकारने अडीच वर्षांत अनेक विकास प्रकल्पांना स्थगिती दिली. राज्यात अडीच वर्ष स्थगिती सरकार होतं. त्यावेळी मंदिरं इतर प्रार्थनास्थळेही बंद केली होती. मात्र, महायुतीचं सरकार आलं आणि आपण राज्यातील सगळी मंदिरं उघडली. तसेच स्थगिती मिळालेल्या सगळ्या योजना पुन्हा सुरु केल्या", असे ते म्हणाले.

दरम्यान, मुख्यमंत्री शिंदेंनी जाहीरनाम्याच्या मुद्द्यावरूनही महाविकास आघाडीला लक्ष्य केलं. "महाविकास आघाडीने आमचा वचननामा चोरून त्यांचा जाहीरनामा प्रकाशित केला आहे. कॉपी पेस्ट करून जाहीरनामा बनवता येत नाही, हे त्यांना माहिती नाही", अशी टीका त्यांनी केली.

"महायुतीचा जाहीरनामा म्हणजे फक्त ट्रेलर आहे. संपूर्ण सीनेमा अजून यायचा बाकी आहे. आम्ही लाडकी बहीण योजनेत महिलांना १५०० वरून २१०० रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही शेतकरी सन्मान योजनेचा निधीदेखील वाढवला आहे. प्रत्येकाच्या मुलभूत गरजा भागवण्यासाठी सरकारने प्रयत्न केले आहेत", असेही त्यांनी सांगितले.

# अलीगढ मुस्लिम विद्यापीठ: अल्पसंख्याक दर्जाच्या प्रकरणावर निर्णय घेण्यासाठी नवीन खंडपीठाची नेमणूक

नवी दिल्ली



अलीगढ मुस्लिम विद्यापीठाच्या (एएमयू) अल्पसंख्याक दर्जाच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या संविधान पीठाने शुक्रवारी चार स्वतंत्र निर्णय दिले. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील या खंडपीठाने सांगितले की, या प्रकरणात चार स्वतंत्र मत आहेत, ज्यात तीन असहमतीचे निर्णय आहेत. सरन्यायाधीशांनी स्वतःसह न्यायमूर्ती संजीव खन्ना, जेबी पारदीवाला, आणि मनोज मिश्रा यांच्यासाठी बहुमताचा निर्णय लिहिला. न्यायमूर्ती सूर्यकांत, दीपांकर दत्ता, आणि सतीश चंद्र शर्मा यांनी बहुमताच्या मतावर असहमती दर्शवली.

सरन्यायाधीशांनी सांगितले की, बहुमताच्या निर्णयाने *एस. अजीज बाशा विरुद्ध भारत सरकार* या १९६७ मधील प्रकरणात दिलेला निर्णय रद्द केला आहे. या निर्णयात पाच न्यायाधीशांच्या संविधान पीठाने एएमयूला अल्पसंख्याक संस्थेचा दर्जा दिला नव्हता. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने अद्याप या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही की एएमयू अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आहे का. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, या शैक्षणिक संस्थेच्या अल्पसंख्याक दर्जाला २००६ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय उलटवण्याचा मुद्दा ठरवण्यासाठी नवीन खंडपीठ नेमण्यात येईल.

सात न्यायाधीशांच्या संविधान पीठाने *संविधानाच्या अनुच्छेद ३०* अंतर्गत एएमयूला अल्पसंख्याक संस्था मानले जाऊ शकते का, यावर निर्णय राखून ठेवला होता.

बहुमताच्या निर्णयाचे वाचन करताना सरन्यायाधीश म्हणाले की, अजीज बाशामध्ये घेतलेली भूमिका, जी एएमयूला अल्पसंख्याक दर्जा नाकारण्याचे कारण ठरली होती, ती आता रद्द केली आहे. तथापि, सरन्यायाधीशांनी एएमयूच्या अल्पसंख्याक दर्जाचा पुनर्विचार करण्यासाठी तीन न्यायाधीशांच्या खंडपीठावर सोपवले आहे, जे या निर्णयात मांडलेल्या तत्त्वांवर आधारित असेल.

सरन्यायाधीशांनी बहुमताच्या निर्णयात नमूद केले की अल्पसंख्याक संस्था असण्यासाठी संस्थेची स्थापना आणि प्रशासन अल्पसंख्याकांकडून असणे आवश्यक आहे आणि संविधानपूर्व काळातील अशा संस्थांना अनुच्छेद ३० अंतर्गत समान संरक्षण मिळेल.

सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की, केवळ संसदीय कायद्याने स्थापना झाल्यामुळे एखाद्या संस्थेला अल्पसंख्याक दर्जा नाकारता येत नाही. अशा स्थापनेचे विविध अन्य घटक आणि पैलू देखील विचारात घेतले पाहिजेत.

# बलात्कार, पॉक्सो आणि महिला अत्याचार प्रकरणात तात्काळ नुकसानभरपाई द्या; सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली

महिला आणि अल्पवयीन मुलांशी संबंधित लैंगिक छळाच्या प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. बलात्कार पीडितांना सीआरपीसी अंतर्गत लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याचे निर्देश न्यायालयाने ट्रायल कोर्टाला दिले आहेत. अशा प्रकरणांतील पीडितांना लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी यासाठी न्यायालयाने जिल्हा आणि राज्य विधी सेवा प्राधिकरणांना सूचनांची त्वरीत अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती बीवी नागरत्ना आणि न्यायमूर्ती पंकज मित्तल बाल संरक्षण कायद्यांतर्गत बलात्काराच्या दोषीच्या जामीन याचिकेवर सुनावणी करत होते. यादरम्यान, सत्र न्यायालयाने निकाल देताना पीडितेला नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले नसल्याचे खंडपीठाला सांगण्यात आल्यावर न्यायमूर्ती नागरत्ना यांनी नाराजी व्यक्त करत ही मोठी चूक असल्याचे म्हटले. त्या म्हणाल्या की, बलात्कार पीडितेला भारतीय नागरी संहितेच्या कलम 396 नुसार, नुकसान भरपाई द्यावी. अशा प्रकरणांमध्ये पीडितांना भरपाई देण्याचे निर्देश न्यायालयाने सर्व जिल्हा न्यायालयांना दिले. 2020 मध्ये महाराष्ट्रात 13 वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या सैबाज नूरमोहम्मद शेखच्या जामीन अर्जावर कोर्टात सुनावणी सुरू होती. त्यावेळी ट्रायल कोर्टाने पीडितेला नुकसान भरपाई देण्याबाबत कोणतेही निर्देश दिले नव्हते, असे न्यायालयाला सांगण्यात आले. न्यायमूर्ती नागरत्ना यांनी सत्र न्यायालयाची ही मोठी चूक असल्याचे म्हटले आणि मुंबई उच्च न्यायालयाला पीडितेच्या प्रकरणात लक्ष घालून तिला भरपाई देण्याचे निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाने आदेशात पुढे म्हटले आहे की, ही सूचना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLSA) किंवा राज्य विधी सेवा प्राधिकरण (SLSA) यांनाही देण्यात यावी. न्यायालयाने रजिस्ट्रीला सर्व उच्च न्यायालयांच्या निबंधकांना आदेश प्रसारित करण्याचे निर्देश दिले आहेत. या नोटीसमध्ये बलात्कार पीडितांना लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्यात यावी, असे सांगण्यात आले आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांवर खटला ; परवानगी घ्या, मनी लॉड्रिंगप्रकरणी कोर्टाचे आदेश

नवी दिल्ली

कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्यावर मनी लॉड्रिंगप्रकरणी खटला चालवताना सरकारमधील प्राधिकृत अधिकाऱ्याची परवानगी आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. ही तरतूद प्रामाणिक व निष्ठावंत अधिकाऱ्यांच्या रक्षणासाठी असल्याचेही न्यायालयाने नमूद केले आहे. बुधवारी एका सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम-१९७ (१) नुसार सरकारी अधिकारी आणि न्यायाधीशांविरूद्ध खटले चालवताना सरकारची परवानगी आवश्यक असते. हीच तरतूद आता मनी लॉड्रिंग कायद्यातही लागू होते.

आंध्र प्रदेशातील सरकारी नोकरदार बिभू प्रसाद आचार्यविरूद्ध इडीने मनी लॉड्रिंगचे आरोप निश्चित केले होते. २०१९मध्ये तेलंगणा हायकोर्टाने सरकारच्या परवानगीशिवाय हा खटला चालवता येणार नाही, असे निर्देश देत हे आरोप फेटाळले.व याविरूद्ध इडीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. न्यायमूर्ती अभय ओक आणि न्या. ए. जे. मसीह यांच्या खंडपीठाने इडीची ही याचिका फेटाळली. इडीने आचार्य यांच्यावर सरकारी भूखंड वाटपात अधिकारांचा गैरवापर करताना भूखंड मूल्यांकन कमी करून माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या कंपन्यांना लाभ दिल्याचा आरोप ठेवला.

# एमएसपीपेक्षा भाव कमी झाल्यास भावांतर योजना राबवून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा होतील- फडणवीस

■ धुळे



"महाराष्ट्राच्या निवडणुकीत मोदींच्या प्रचाराची सुरुवात खान्देशातील धुळ्यात होतेय, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. ही सुरुवात धुळ्यातून यासाठी केली, कारण मोदींच्या नेतृत्वात गेल्या 10 वर्षात जे काम झालं, त्यामुळे पुढच्या पाच वर्षात धुळे जिल्हा महाराष्ट्रातील नंबर 1 जिल्हा होणार आहे. आज आपण पाहतोय, ज्या प्रकारे सुलवाडे-जामफळच्या माध्यमातून या जिल्ह्याच्या प्रत्येक शेतीला पाणी जातय. शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पाणी पोहोचलय. अक्कलपाडा धरणाची उंची वाढवून त्याठिकाणी धुळे शहराला पिण्याच्या पाण्याची कधीच टंचाई भासणार नाही अशी काम होत आहेत" असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते धुळ्यात प्रचारसभेत बोलत होते. विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींची महाराष्ट्रात पहिली सभा धुळ्यामध्ये झाली.

"मोदींच्या नेतृत्वाखाली मनमाड-इंदूर रेल्वेसेवेच्या माध्यमातून एक अशा प्रकारच सेंटर धुळ्यात तयात होतेय. मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडोर, धुळे-मनमाड रेल्वे या सगळ्याचा एकत्रित विचार केला, तर इंडस्ट्रीज लॉजिस्टिक सेंटर कुठलं असेल, तर धुळे जिल्हा असेल. मोदींनी सहा राष्ट्रीय महामार्ग धुळ्याला दिले" असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. "धुळे जिल्हा 100 टक्के रिझल्ट देणार. पाचही जागा महायुतीच्या निवडून येणार. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार लाडक्या बहिणींना मदत करतय. मुलींना मोफत शिक्षण, मोदींच्या नेतृत्वाखाली लखपती दीदी या योजना सुरु आहेत. शेतकऱ्यांसाठी 1 रुपयात 8 हजार रुपये पीक विम्याची योजना सुरु आहे. शेतकऱ्यांना वीज बिल माफ करुन सरकारने शेतकऱ्यांची वीज बिलातून मुक्ती केली. पुढच्या पाचवर्षांसाठी वीज बिलातून मुक्ती सरकारने दिलीय" असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

"तुमच्या आशिर्वादाने महाराष्ट्रात सरकार आलं की, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्याशिवाय MSP पेक्षा भाव कमी झाल्यास भावांतर योजना राबवून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा होतील" असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

"एकीकडे आम्ही विकास करतोय. सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन महाराष्ट्र पुढे नेतोय. दुसरीकडे आमच्या विकासाला उत्तर देता येत नाही, म्हणून आमच्या विरोधकांनी रणनिती आखली आहे. धुळ्यात ते वोट जिहाद करतायत. आम्ही लोकसभेला धुळ्यात 1 लाख 90 हजार मतांनी पाचही मतदारसंघात पुढे होतो. पण मालेगाव सेंट्रल आणि धुळ्यातील वोट जिहादमुळे चार हजार मतांनी पराभव झाला. आता जागे झालो नाही, तर नेहमीसाठी झोपावं लागेल. ही निवडणूक जागं होण्याची आहे" असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# मेहकरात वाटपासाठी ४० खोके आले आहेत

## प्रकाश आंबेडकर यांचा खळबळजनक आरोप

■ बुलढाणा

शिवसेनेतील बंडाळीनंतर पन्नास खोके सारेच ओकेचा नारा गुंजला. यानंतर त्याचे पडसाद विधानसभा परिसर ते वेळोवेळी होणाऱ्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट)च्या जाहीर सभा, सन २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणूक प्रचार सभा, एवढेच काय कोणत्याही कार्यक्रमात हा नार गुंजत राहिला, आरोप होतच राहिले. सध्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारातही पन्नास खोके गाजताहेत. नेते सांगायचे विसरले तरी ठाकरे गटाचे शिवसैनिक हा नारा देत नेत्याला त्याची आठवण करून देतात. सोमवारी, ११ नोव्हेंबर रोजी हे सर्व आठवायचे कारण की, राज्यातील एका नेत्याने प्रचार सभेत पुन्हा खोक्यांची आठवण करून दिली आहे. आरोप खोक्यांचाच आहे, आकडा दहा खोक्यानी कमी आहे आणि वाटप नेत्यांऐवजी मतदारांत होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. एवढाच काय तो फरक आहे.

हा आरोप करणारा नेता मात्र शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचा नाही! मात्र हा नेता राजकीय भूमिकेमुळे टीकेचा धनी ठरलेले वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश उपाख्य बाळासाहेब आंबेडकर आहे.त्यांनी हा खोक्यांचा बॉम्ब टाकलाय! बुलढाणा जिल्ह्यातील अनुसूचित जाती करिता राखीव मेहकर विधानसभा मतदारसंघात वंचित आघाडीतर्फे ऋतुजा चव्हाण रिंगणात आहे. ऋतुजा चव्हाण यांच्या प्रचारासाठी प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी मेहकर मध्ये उर्दू शाळा क्रमांक तीन परीसरातील स्वतंत्र मैदानात जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी मेहकर मतदारसंघात वाटण्यासाठी चाळीस खोके आल्याचा खळबळजनक आरोप केला. यावेळी त्यांनी पक्षाचा थेट उल्लेख केला नसला तरी त्याचा रोख युतीकडे होता. यावेळी आंबेडकर म्हणाले की, मेहकर मतदारसंघात एक एक मत दहा हजार रुपयाला विकले जाण्याची शक्यता आहे. कारण मला माहिती मिळाली की , कुठे कुठे चाळीस कोटी रुपये आलेत.

# अनिल अंबानींना मोठा धक्का; पॉवर कंपनीवर तीन वर्षांसाठी बंदी

■ मुंबई

अनिल अंबानींच्या रिलायन्स पॉवर कंपनीवर सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने कारवाई केली आहे. त्यामुळे शुक्रवारी बाजार उघडताच रिलायन्स पॉवरच्या शेअरमध्ये मोठी घसरण पाहायला मिळाली. ३ ऑक्टोबर रोजी रिलायन्स पॉवरचा शेअर ५४ रुपयांवर गेला होता. मात्र कारवाईनंतर आता शेअरची किंमत पडली असून आज तो ४१.४७ रुपयांवर आला. रिलायन्स पॉवर आणि रिलायन्स NU BESS लिमिटेड या कंपनीला तीन वर्षांसाठी सरकारी कंपनीच्या निविदेत सहभागी होण्यापासून बंदी घातल्यामुळे आता अनिल अंबानी यांना धक्का बसला आहे. निविदेत सहभागी होण्यासाठी अनिल अंबानींच्या कंपनीतर्फे बोगस कागदपत्र सादर केली गेली, यासाठी त्यांच्या कंपन्यांवर ही कारवाई होत असल्याचे निवेदन सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने दिले आहे.

महाराष्ट्र एनर्जी जेनरेशन लिमिटेड ज्याचे नाव आता रिलायन्स NU BESS लिमिटेड असे आहे. या कंपनीकडून सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्या होत्या. विदेशी बँकाद्वारे अर्नेस्ट मनीसाठी जी बँक गॅरंटी देण्यात आली होती, ती बोगस असल्याचे लक्षात आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने आपल्या निवेदनात म्हटले की, निविदा भरणारी कंपनी मेसर्स रिलायन्स पॉवर लिमिटेडची उपकंपनी असल्यामुळे त्यांनी मूळ कंपनीच्या ताकदीचा वापर करून आर्थिक पात्रता पूर्ण केल्या होत्या. जेव्हा या प्रकरणाची तपशीलवार तपासणी करण्यात आली तेव्हा आढळले की, रिलायन्स NU BESS ने घेतलेले सर्व निर्णय हे त्यांची पालक कंपनी रिलायन्स पॉवरच्या सल्ल्यानुसार घेतले होते.

# दोन पक्ष फोडल्याचा कसला अभिमान बाळगता- सुप्रिया सुळे



■ पिंपरी

महाविकास आघाडीचे सरकार पाडण्यासाठी भाजपने एकनाथ शिंदे यांच्यासोबतच्या ४० आमदारांना प्रत्येकी ५० कोटी रुपये दिले, असे दोन हजार कोटी रुपये खर्च करून सरकार पाडले. असे असताना दोन पक्ष फोडून आल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगत आहेत. दोन पक्ष फोडल्याचा कसला अभिमान बाळगता, असा सवाल राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. पुण्यातील वर्तुळाकार मार्गासाठी (रिंगरोड) वाढीव २० हजार कोटी रुपये कोणाच्या घशात गेले, हे जनतेला कळले पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.

महाविकास आघाडीचे भोसरीचे उमेदवार अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ मोशीत आयोजित महिला मेळाव्यात खासदार सुळे बोलत होत्या. माजी आमदार विलास लांडे, प्रकाश म्हस्के, शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी महापौर मोहिनी लांडे, सुलभा उबाळे यावेळी उपस्थित होते. पुणे जिल्ह्यातील वर्तुळाकार मार्गाला आमचा विरोध नाही. त्यातील भ्रष्टाचाराला विरोध आहे. वर्तुळाकार मार्गाच्या कामाचा मूळ खर्च १८ हजार कोटी रुपये होता. त्यामध्ये २० हजार कोटींची वाढ केली. त्यामुळे वर्तुळाकार मार्गाचा खर्च ३८ हजार कोटींवर गेला आहे. वाढीव २० हजार कोटी रुपये कोणाच्या घशात गेले, हे आम्हाला कळले पाहिजे. या कामातील भ्रष्टाचार बाहेर काढला जाईल. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर या कामाचा कंत्राटदार बदलण्यात येईल असे सांगून खासदार सुळे म्हणाल्या, की आमचा संघर्ष वैयक्तिक नाही. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार आणि अदृश्य शक्तीविरोधात आमची लढाई आहे.

# निवडणूक भरारी पथकातील अधिकाऱ्यांचा शेतकऱ्यांच्या पैशावर डल्ला, पाच निलंबित

■ ठाणे

निवडणुकीच्या आचारसंहिता काळात प्रशासनाच्या भरारी पथकांनी अवैध आर्थिक व्यवहारांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा असते. मात्र, उल्हासनगरात अशाच एका पथकाने स्वतःच खंडणी उकळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. फुले उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाचे पैसे देण्यासाठी रोख रक्कम घेऊन जाणाऱ्या व्यापाऱ्याकडून ८५ हजारांची खंडणी घेण्यात आली आणि हे प्रकरण १३ दिवसांनी समोर आलं. अखेर याप्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यातील पाचही अधिकाऱ्यांवर जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी यांनी तडकाफडकी निलंबनाची कारवाई करत घरचा रस्ता दाखवला आहे. २८ ऑक्टोबर रोजी पहाटे व्यापारी बबन आमले आणि त्यांचे मित्र नितीन शिंदे हे कल्याणवरून अहमदनगर आणि पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फुले उत्पादनाच्या विक्रीचे पैसे देण्यासाठी जात होते. म्हारळ चौकीजवळ आचारसंहिता भरारी पथक क्रमांक सहाचे प्रमुख संदीप शिरसवाल यांनी त्यांची गाडी अडवून तपासणी केली. तपासणी दरम्यान, त्यांच्याकडं ७ लाख ५० हजार रुपये रोख सापडले. यानंतर, पथकप्रमुखांनी आमले आणि शिंदे यांना गुन्हा दाखल करण्याची भीती दाखवली. आमले यांनी पावत्या दाखवून पैसे वैध असल्याचं स्पष्ट केलं, तरीही शिरसवाल यांनी त्यांच्याकडून ८५ हजार रुपये खंडणी घेतली. स्थानिक माध्यम प्रतिनिधींनी या प्रकरणाबद्दल निवडणूक निर्णय अधिकारी आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडं विचारणा केल्यानंतर कारवाई सुरू झाली. अखेर, उल्हासनगर महापालिकेचे सहायक आयुक्त आणि विधानसभेचे आचारसंहिता पथक प्रमुख सुनिल लोंढे यांच्या फिर्यादीवरून या पाच जणांविरुद्ध खंडणी आणि आचारसंहितेचं उल्लंघन केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी पथकातील सर्व पाच सदस्यांना तत्काळ निलंबित करण्यात आलं असून, त्यांच्या जागी नवीन कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. यापुढे प्रत्येक तपासणीचं चित्रीकरण करणं अनिवार्य असल्याचं आदेश त्यांनी दिले.

# काहीही करा पण पवार साहेबांचा नाद करू नका- रोहित पवार

■ बारामती



भाजप नेते म्हणतात 'बटेंगे तो कटेंगे', तर पंतप्रधान नरेंद्र मोदी काही वेगळंच म्हणतात. अमित शहांचं तर 'लईच' भारी. लोकसभा निवडणुकीदरम्यान ते महाराष्ट्रात आले आणि म्हणाले की, "पवार साहाब" मै आपसे पूछ रहा हु दस साल मे आपने क्या किया बताओ..! याचा पुरावा ते मागत होते. त्यांना लोकसभेत लोकांनी पुरावा दिला. थेट २३ वरून ९ वरच आकडा आणला. पवार साहेबांनी काय केलं आहे. हे अख्ख्या दुनियेला माहित आहे आणि ते विचारतात पवार साहेबांनी काय केलं? अशी खोचक टीका राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या प्रचारार्थ आमदार रोहित पवार आज बारामतीत आले होते. यावेळी त्यांनी सुपे येथे ग्रामस्थांशी संवाद साधला. पुढे बोलताना ते म्हणाले की, कोल्हापूरलाही असेच कोणीतरी म्हणाले. त्यांना मी सांगू इच्छितो की, दहा दिवस थांबा. १७० ते १८० महाविकास आघाडीचे आमदार निवडून येणार, असा विश्वास यावेळी रोहित पवार यांनी व्यक्त केला. 'पवार साहेब गेल्या साठ वर्षांपासून राजकारणात आहेत. त्यांनी दिलेला शब्द प्रामाणिकपणे पाळला. पवार साहेब जे शब्द देतात, ते पूर्ण केल्याशिवाय राहत नाहीत. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना चॅलेंज केले होत की, पवार साहेबांचं राजकारण आता संपलं आहे. नवीन पैलवानाची आवश्यकता आहे.'

# एखादा दहशतवादीच असे बोलू शकतो...

## 'बटेंगे तो कटेंगे' विधानावरून मल्लिकार्जुन खरगे संतापले

■ नवी दिल्ली

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर टीका करत एकाच पक्षातील दोन्ही नेते आपापल्या भाषणात विरोधाभास असलेली वक्तव्य करत असल्याचं म्हटलं आहे. मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदींनी दिलेली एक है तो सेफ है ही घोषणा आणि मुख्यमंत्री योगी यांनी दिलेली बटेंगे तो कटेंगे या घोषणेवरुन प्रश्न उपस्थित केले आहेत. पंतप्रधान मोदी आणि योगी यांनी आधी ठरवावं की देशात नेमकी कोणती घोषणा लागू करावी, जेणेकरुन देशातील जनतेमध्ये कोणाताही भ्रम राहू नये.

झारखंडमध्ये पलामूमध्ये छत्तरपूर विधानसभा क्षेत्रात एका सभेत मल्लिकार्जुन खरगे बोलत होते. त्यावेळी बोलताना त्यांनी म्हटलं, की बटेंगे तो कटेंगे असं विधान एखादा साधू करू शकतो का? कोणताही साधू असं विधान करू शकत नाही. एखादा नाथ संप्रदायाचा साधू असं बोलू शकत नाही. ही बाब एखादा आतंकी, दहशतवादी करू शकतो, असंही ते म्हणाले. हम डरेंगे तो मरेंगे, पण आम्ही घाबरणारे नाही, असं ते म्हणाले.



खरगे यांनी त्यांच्या भाषणात बोलताना, मोदी आणि योदी यांचा उद्देश देशातील एकता संपवणं असून केवळ आपली सत्ता ठेवण्यासाठी ते अशाप्रकारच्या घोषणा देत आहेत. या घोषणांचा उद्देश देशातील लोकांमध्ये फूट पाडणं, जेणेकरुन ते आपला राजकीय स्वार्थ साधू शकतील. मोदी आणि योगी करत असलेल्या घोषणाबाजी ही दादागिरी असल्याचंही ते म्हणाले. कर्नाटकात निवडणुकीच्या समिकरणांबाबत बोलताना खरगे यांनी सांगितलं, की आतापर्यंत त्यांनी चार निवडणूक सभा घेतल्या असून त्यांना पूर्ण विश्वास आहे, की यावेळी राज्यात त्यांचं सरकार स्थापन होणार आहे. काँग्रेस आणि इतर मित्रपक्ष एकत्र येऊन कर्नाटकात सत्ता स्थापन करतील. तसंच ते महाराष्ट्रातही काम करत असून सर्व पक्ष मिळून आपली ओळख बनवत असल्याचं ते म्हणाले. मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री योगी यांच्यावर देशाचं विभाजन करण्याचं धोरण स्वीकारल्याचा आरोप केला आहे. मात्र या दोन्ही नेत्यांच्या घोषणा विरोधाभासी असून यांचा उद्देश केवळ सत्ता राखणं असल्याचं म्हणत आरोप केले आहेत.

अक्रॉस मुंबई यह सप्ताहिक स्वामी संजय तेजसिंग खिमेसरा के लिए मुद्रक, प्रकाशक- संजय मंगेश भैरे द्वारा सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड-२, नियर जवाहर नगर, फाटक ब्रीज, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३ से मुद्रित और राजेंद्र पार्क, बिल्डिंग नं. २/२०, चौथा माला, स्टेशन रोड, गोरेगांव (प.) मुंबई -४००१०४ यहां प्रकाशित किया। संपादक - संजय मंगेश भैरे फोन : ०२२-४९७१९९३२ ईमेल: sanjay.bhaire@gmail.com RNI NO: MA HBIL/2016/68485